१८२४
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ५

चिपळूण

# इतिहास.

## या विषयावरील निबंध

सोल एजन्ट.

मुरलीधर मल्हार अत्रे.

महाराष्ट्र बुकडेपो पुणें.

२७१५ प्रकाशक

कृष्णराव बापूजी मांडे, शनवारपेठ पु

REFBK-0002715

मुद्रक

...कर जगद्हितेच्छु

किंमत

REFBK-0002715

# ...स.

कोऽन्यःकालमतिक्रांतं नेतुं प्रत्यक्षतां क्षमः ।
कविप्रजापतींस्त्यक्त्वा रम्यनिर्माणशालिनः ॥

राजतरंगिणी.

१ हा विषय मोठा दांडगा आहे; यावर जितकें लि-
हावें तितकें थोडेंच, कारण खुद्द विषयच अगोदर मोठा अ-
सून त्याचीं अंगें उपागेंही अनेक आहेत, तीं अशीं कीं,
यावर लिहिणारानें जगाच्या इतिहासावर एकंदर नजर पों-
चविली पाहिजे; असें केल्यानें त्यास जे मुख्य मोठमोठे सि-
द्धांत सामान्यतः दिसतात त्यांचा उल्लेख केला पाहिजे;
नंतर प्रत्येक मोठमोठ्या राष्ट्राच्या इतिहासाकडे विशेषतः
दृष्टि देऊन त्याच्या विषयीं लिहिलें पाहिजे. तसेंच भूगो[illegible]
व कालक्रम कीं, ज्यांस इतिहासाचीं नेत्रें ह्मणतात—त्[illegible]
षयीं देशांच्या स्थितिविशेषाचीं फलें—ह्मणजे अमुक [illegible]
देशाची रचना अशा अशा प्रकारची असल्यामुळें [illegible]
परिणाम उद्भवले—याविषयीं;—विद्याकलादिकां[illegible]
कसकसा होत गेला, तो प्रकार; किंबहुना रीती[illegible]
राव वगैरे लहानसहान गोष्टी यांविषयीं [illegible]
माहिती आली पाहिजे, सारांश, इतिहास[illegible]
मूळारंभापासून आजपर्यंत ज्या ज्या [illegible]
सर्वांचें टिप्पण ज्या ग्रंथांत केलें असतें [illegible]

२. आतां पहिल्यानें या शब्[illegible]
त्कारिक आहे ह्मणून सांगतों. य[illegible]
शब्द आहेतः— 'इति- ह- आस ' यांचा [illegible]
झालें, असा आहे, तेव्हां या शब्दाचा अर्थ '[illegible]

वृत्तांत' असा आहे- पण मूळच्या व आतांच्या अर्थांत एक मोठा भेद झाला आहे. या शब्दाचा मूळचा अर्थ पुराणांतील उपकथा ह्मणजे अप्रधान गोष्ट असा होता:–जशा धर्मराजास वगैरे निरनिराळ्या प्रसंगीं ऋषींनीं सांगितलेल्या प्राचीन राजांच्या गोष्टी; पण हल्लीं 'इतिहास' हा शब्द 'बखर' या अर्थीं योजतात, तेव्हां दोहोंतला भेद उघडच आहे कीं, पहिल्यास प्रमाण केवळ ऋषींचे पुराणांतील लेखच काय ते होत पण दुसऱ्यास त्यांहून सबळ असे अनेक आधार लागतात.

३. वर जो 'इतिहास' शब्दाचा जुना अर्थ सांगितला त्यावरून स्पष्ट दिसतें कीं, अर्वाचीन अर्थी तो शब्द ज्यांस लागेल असे ग्रंथ आपल्या देशांत प्राचीन काळीं नव्हते. ह्मणजे ग्रीक व रोमन लोकांत सप्रमाण व खरे इतिहास लिहिण्याची जशी पुढें प्रवृत्ति पडली, तशी इकडे कधींही ...ली असेलशी दिसत नाहीं, हा एके रीतीनें मोठा चम... आहे, कारण जे प्राचीन हिंदु लोक त्या वेळेस सर्व ... हरएक प्रकारें अग्रगण्य होते, ज्यांच्यांत विद्या तर ...गानें पूर्ण अवतरली होती, त्यांच्या हातून येवढें ...ग सुटावें ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय! ... तथापि तीबद्दल कांहीं कारणें सांगतां येतील ...तें, इतिहासाचा उद्भव केव्हां होऊं लागतो ...ण थोडा विचार केला तर असें दिसून ...ेस राष्ट्रांत मोठ्या लढाया, मोठ्या ...ीं मोठमोठ्या गोष्टी घडतात तेव्हां ...ील लोकांत तसेंच मुसलमान, ... घडलेल्या गोष्टींचें वृत्त लिहून ...ाच प्रसंगीं पडली, असो; तेव्हां हें ... तर प्राचीन हिंदु लोकांत इतिहासग्रंथांचा

अभाव कां राहिला याचें कारण बरेंच स्पष्ट होईल. त्यांच्या देशाच्या चतु:सीमा बहुधा अलभ्यच असल्यामुळें प्राचीन चिनी लोकांप्रमाणेंच आपले पूर्वजही आपल्या ठिकाणींच स्वस्थ सुखरूप होते, ग्रीक, रोमन वगैरे लोकांचा शेजारच्या राष्ट्रांशीं जसा नेहमीं संबंध पडेच, तसें येथें मुळींच नसल्याच्या योगानें परराष्ट्रांशीं युद्धादि प्रसंग प्राचीन हिंदु लोकांचे कधींच घडले नाहींत, देशांतल्या देशांतच राजेरजवाड्यांच्या एकमेकांशीं लढाया होत असतील खऱ्या, तरी इतिहासरूपानें त्यांचें वर्णन करावें अशा तऱ्हेच्या त्या कधींहि झाल्या असतीलशा वाटत नाहींत; कारण, त्या वेळचे जे कांहीं संस्कृत ग्रंथ अजून उपलब्ध आहेत त्यांत अनेक राजे स्वतंत्रपणें राज्य करीत असल्याचे उल्लेख आढळतात. पण एकानें सार्वभौमत्व पावून बाकीच्यांस पादाक्रांत करून टाकिलें आहे असें कोठें आढळत नाहीं. असो; तेव्हां मोठे युद्धप्रसंग, मोठ्या राज्यक्रांति वगैरे जी इतिहासाची सामग्री ती नसल्यामुळें इतिहास लिहून ठेवण्याचा पाठ इकडे पडला नसेल असें वाटतें. दुसरें एक मोठें कारण असेंही दिसतें कीं, आपल्या मनाचा एकंदर कल प्रवृत्तिमार्गाकडे नाहीं. जग सर्व मिथ्या आहे, प्रपंचांतील सर्व व्यवहार लटके आहेत, अवघा ईश्वरी मायेचा गोंधळ आहे,– ...्या अजाण व

> **दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा त्र** ...थ घालून झोका-
> **धरील मन आधिनें बहु परिभ्र**...

...चा प्राचीन इतिहास

असे विचार ज्यांच्या मनांत नेहमींच; पण याखेरीज परमार्थाकडेच ओढा विशेष, अशा ...र्वीं आहेत. प्राचीन ज्यांच्या घडामोडी वगैरे गोष्टींचीं वर्णनें; त्यांस आपल्या गात बसण्याचा कंटाळा असल्यास काय नरी ...

व ...टेंस इ-

आपल्या देशांत इतिहासकार न झाल्याचीं हीं दोन मोठीं कारणें आह्मांस वाटतात.

४. वर प्राचीन हिंदु लोकांचा इतिहास लिहिण्याचा परिपाठ नव्हता ह्मणून ह्मटलें, यावरून त्याविषयींची माहिती मिळण्यास मुळींच मार्ग उरला नाहीं असें समजायाचें नाहीं. निबंधाच्या अग्रभागीं जें पद्य घातलें आहे त्यावरूनच मार्मिक वाचणाराच्या सहज लक्षांत येईल कीं, इतिहासाची योग्यता आपले लोक जाणत नव्हते असें नाहीं. संस्कृतांत चांगले इतिहास नाहींत खरे, तरी पूर्वीं घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याचा नाद आपणांस अगदीं नव्हता असें नाहीं. वर ज्यांतून उतारा घेतला आहे तो 'राजतरंगिणी' ग्रंथच याविषयीं मोठें प्रमाण आहे. यांत काश्मीरदेशच्या राजांचें वर्णन अगदीं मूळारंभापासून तों तहत अकबर बादशहानें तो देश काबीज केला येथपर्यंत आहे. हा इतिहास निरनिराळ्या पंडितांनीं आपआपल्या वेळेपर्यंत आणून पोंचविला आहे. संस्कृत ग्रंथकारांचे शक बसविण्यास हा ग्रंथ फार उपयोगीं पडतो. असाच दुसरा इतिहासरूप ग्रंथ आह्मांस कांहीं वर्षांपूर्वीं पाहिलेला आठवतो; त्यांत बंगाल्याकडील मोंगलांच्या राजांचा वृत्तांत लिहिला होता. 'विविधज्ञानविस्तारां'त काशिराज-
[illegible] तनानें लिहिलेला पानपतच्या लढाईविषयींचा
[illegible] ठांनीं वाचला असेलच. तो जरी नबाबाच्या
[illegible] पंडितानें फारशी भाषेंत लिहिला, तरी
[illegible] आमच्या वरच्या ह्मणण्यास बाध येत
[illegible] न्ही आमच्या हिंदु लोकांस व विशे-
[illegible] स्पदच होत. एक तर पदरच्या मनु-
[illegible] बाबानें वरच्या पंडितासच तो वृत्तांत
[illegible] तला यावरून त्याचें त्या भाषेंत अत्यंत

सं.ग्रं. ५७

निपुणत्व दिसून येतें. आणि दुसरें, चांगला इतिहास लिहिण्यापुरती त्याच्या अंगीं शक्ति व हौस होती असें ह्मटलें पाहिजे. हौस होती असें ह्मणण्याचें कारण उघडच आहे कीं, ती नसती तर स्वदेशीयांचा त्या घोर युद्धांत जो अगदीं मोड झाला—कीं जो या देशास अजून भोंवतो आहे, आणि यापुढें तर कोणत्या परिणामास नेऊन पोंचवील, ईश्वर जाणे !—त्याची हकीकत लिहिण्याचें काम कोणीही हिंदु खचीत पतकरताना ! असो; तेव्हां इतिहास लिहिण्याचा आपल्या लोकांस अगदीं नाद नाहींसा नव्हता हें वरील उदाहरणावरून दिसून येईल. व आह्मांस असेंही वाटतें कीं, आपल्याकडे इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति कमी तर खरीच, परंतु वरच्यासारखे फुटकळ ग्रंथ पूर्वीं पुष्कळ लिहिलेले असतील. त्यांचा कालगत्या लोप होऊन त्यांतले अजूनही कदाचित् कोठें सांपडण्यासारखे असतील. हा आमचा तर्क खरा असला तरी आमच्या लोकांस त्यापासून मोठासा उपयोग नाहीं हें उघड आहे. नानाप्रकारचे शोध करण्याच्या वगैरे सर्व कामांचा मक्ता आह्मी आमच्या राज्यर्त्यांस देऊन टाकला आहे. त्यांनीं ते शोध करून विलायतेस नेऊन तेथून मोक्षमुल्लर, डॉक्टर हौग अशांच्या शिक्यामोर्तबासहित ते इकडे आले, ह्मणजे मग ते आमच्या अजाण व भोळ्या देशबंधूंपुढें मोठ्या पांडित्याचा आव घालून झोकानें मिरविण्याचें आमचें काम !

९. पण इतकेंच नव्हे. आपल्या देशाचा प्राचीन इतिहास वरच्यासारख्या ग्रंथांवरून तर समजतोच; पण याखेरीज दुसरींही कित्येक साधनें तो समजण्याचीं आहेत. प्राचीन ग्रीक व रोमन लोक मोठे शोधक असत; त्यांस आपल्या देशाची जरी चांगलीशी माहिती नव्हती, तरी [illegible] भागांविषयीं त्यांच्या कित्येक ग्रंथांतून लेख [illegible]टेस इ-

ते येथील प्राचीन इतिहासाची माहिती होण्यास कांहींसे साधन आहेत. ईजिप्ट ( मिसर ) देशांत टॉलेमी ह्मणून एक मोठा नामांकित भूगोलवेत्ता होऊन गेला. त्याचे ग्रंथ, तसेच चिनी लोकांचे ग्रंथ, यावरूनही प्राचीन हिंदुस्थानाविषयीं बरीच माहिती मिळते. त्याप्रमाणें पूर्वींचे जयस्तंभ, ताम्रपत्रें, लेणीं वगैरेही पूर्वींच्या काळचें ज्ञान होण्यास कांहींशीं साधन होतात. याशिवाय ' मुद्राराक्षस ', ' मृच्छकटिक ' अशा ऐतिहासिक नाटकांवरून वगैरेही प्रसंगविशेषीं प्राचीन इतिहासाच्या कांहीं गोष्टी कळतात. सारांश, आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती याप्रमाणें तुटक तुटक मात्र होण्याची सध्यां सोय आहे. पहिल्यापासून अनुक्रमानें लिहिलेले इतिहास जर असते, तर जसें पूर्ण ज्ञान होतें, तसें होण्याची आतां मुळींच आशा नको.

६. याप्रमाणें इतिहासाचा अभाव हें आपल्या प्राचीन विद्येचें मोठेंच व्यंग होय. आतां हें शास्त्र केव्हां व कोठें प्रथमतः उत्पन्न झालें, त्याचा प्रसार कसा झाला, याविषयीं लिहितों.

साऱ्या जगांत ज्ञानाचा प्रसार जो झाला आहे त्याचे उगम मुख्यतः दोन होत. एक हिंदुस्थान, आणि ग्रीसदेश. पहिला देश जसा एशियाखंडाचें नाकें होतें, तसा दुसरा देश युरोपाचें होतें. अर्वाचीन काळीं युरोपांतील सर्व देशांत जी सुधारणा झाली आहे तिचें मूळ केवळ ग्रीसदेश होय. विद्याकलादिकांची अलीकडे इंग्लंड वगैरे देशांत पुष्कळ वृद्धि झाली, व दिवसेंदिवस होत आहे हें खरें आहे; पण सर्वांचें आदिपीठ पाहिलें असतां वर सांगितलेला देशच होय. असो; तर युरोपांत जी इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति पडली आहे तिचेंही कारण ग्रीसदेशच होय. या देशांत [illegible] हा पहिला इतिहासकार झाला. यास्तव होमर [illegible] कवि हें पद जसें जोडतात, तसें यास आद्य इति-

हासकार ह्मणतात. ग्रीक लोकांचें पारशीकांशीं मोठें दारुण युद्ध ज्या काळीं चाललें होतें त्याच काळांत हा जन्मला. यानें दूरदूरच्या देशीं प्रवास करून आपल्या इतिहासास उपयोगीं पडेलशी पुष्कळ माहिती मिळविली, आणि ग्रीक भाषेंत पहिल्यानें इतिहास रचिला. तो त्यानें ' ऑलिंपिक् गेम्स ' नांवाचे पांच पांच वर्षांनीं जे सार्वजनिक उत्सव होत असत त्यांतील एका प्रसंगीं आपल्या देशबंधूंपुढें वाचला. त्यांतील विषयच अगोदर देशाभिमानाचा--ह्मणजे ग्रीक लोकांच्या पराक्रमांचें वर्णन असल्यामुळें, व इतरही चमत्कारिक माहिती मोठ्या चातुर्यानें आंत घातली असल्यामुळें, तो ग्रंथ सर्व लोकांस फारच प्रिय झाला. इतका कीं, त्यांच्यांत नऊ ज्या विद्याधिदेवता मानिल्या असत त्यांचीं नांवें त्या ग्रंथाच्या नऊ सर्गांस जमलेल्या समाजानें लागलींच ठेविलीं याच प्रसंगीं दुसरीहीं एक चमत्कारिक गोष्ट अशी सांगतात कीं, वर सांगितलेला इतिहास हिराडोटस वाचीत असतां त्या समाजांत एका नऊ वर्षांच्या मुलास इतका गहिंवर आला कीं, तो आंसवें ढाळूं लागला. तें त्या इतिहासकर्त्यानें पाहून त्या मुलाच्या बापापाशीं असें भाकित केलें कीं, हा तुमचा मुलगा पुढें मोठा नामांकित इतिहासकार निपजेल ! आणि खरोखरीच तसें घडून आलें. तो लहान मुलगा पुढें ग्रीस देशांतला, किंबहुना साऱ्या जगांतला, अत्युत्कृष्ट इतिहासकार थुसिडिडीअस झाला ! असो; याप्रमाणें आणखीही कित्येक इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेले. त्या सर्वांत वरच्या दोहोंसारखा विख्यात झटला ह्मणजे सॉक्रेटीस याचा शिष्य जिनाफन हा तिसरा होय. ग्रीक लोकांच्या वीर्याचा व वैभवाचा अस्त झाल्यावर पुढें रोमन लोकांची भरभर झाली. तेव्हां यांच्यांतही कित्येक मोठमोठे इतिहासकार झाले; लिव्ही सालस्ट् , सीजर, प्लूटार्क, टासिटस इ-

त्यादि. पुढें रोमन लोकांनींही हजार दीड हजार वर्षें राज्यवैभव भोगल्यावर त्यांची सद्दी संपली; आणि अरब व तुर्क लोक यांचें दैव उदयास आलें. या आरबांचें त्यांच्या शौर्याखेरीज त्यांचें स्वतःचें असें थोडेंच निघेल! धर्म तर यहुदि व ख्रिस्ती यांच्या धर्मांची भेसळ करून व कांहीं पदरचें घालून सरासरी बनवलेला, तसेंच विद्या व कला याही ग्रीक व हिंदु लोकांच्याच घेऊन यांनीं आपल्या ह्मणून ह्मणविलेल्या आहेत. तेव्हां सदर्हूप्रमाणेंच इतिहास लिहिण्याचा प्रघातही त्यांच्यांत मूळचा असेलसें दिसत नाहीं; तो त्यांनीं ग्रीक लोकांपासून घेतला असावा. असो; याप्रमाणें इतिहासाची उत्पत्ति होऊन त्याचा प्रसार जगांत झाला. अलीकडील इंग्लिश वगैरे लोकांनीं तर थेट ग्रीक व रोमन लोकांपासूनच तो उचलला हें वर सांगण्यांत आलेंच आहे; व हल्लींच्या काळीं हेच लोक बाकी सर्वांहून ज्ञानसंपन्न विशेष असल्यामुळें तो लिहिण्याची उत्कृष्ट पद्धति यांच्यांतच आहे. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, हल्लीं सगळ्या भूगोलाची माहिती झाली असल्यामुळें इतर सर्व देशांचेंही इतिहास त्यांनीं लिहून ठेवले आहेत.

७. याप्रमाणें प्रस्तुत विषयास उपोद्घातरूपानें जी माहिती सांगणें अवश्य होतें ती सांगितली. आतां खुद्द विषयाविषयीं विचार करूं. पहिल्यानें इतिहासाचा उपयोग काय? हा प्रश्न दिसतांच असमंजस दिसून कोणी करीत नसतीलसें प्रथमतः वाटतें. कां कीं, दुसरा कोणताही उपयोग नाहीं ह्मटला, तरी मनुष्याच्या मनास अत्यंत स्वाभाविक अशी जी जिज्ञासा ती तरी त्याच्या योगानें तृप्त होते, हाच काय थोडा उपयोग आहे? हा अगदीं निदानपक्षींचा उपयोग सांगितला,—दुसरें जे इतिहास वाचल्यापासून मोठमोठे नफे आहेत ते पुढें सांगण्यांत येतीलच. असो; पण असें असतांही

इतिहासांत ज्यांस कांहीं अर्थ दिसत नाहीं, जे त्याचा तिरस्कार करतात, असे मनुष्य पुष्कळ आढळतात. ज्यांच्या मनांत कधीं ज्ञानानें प्रवेश केला नाहीं, किंवा तो व्हावा असा ज्याविषयीं ईश्वरी संकेतच दिसत नाहीं, अशांनीं वरील मतें प्रगट केल्यास कांहीं नवल नाहीं; पण नवल हें कीं, ज्यांच्याठायीं विचारशक्ति चांगली प्रखर दृष्टीस पडते, जे समंजसतेचा मोठा आव घालतात, अशांमध्येंही इतिहासावरची अप्रीति पुष्कळ वेळां दृष्टीस पडते. इंग्रज लोकांतला प्रसिद्ध ग्रंथकार जॉन्सन् हा अशाविषयींचें एक मोठें उदाहरण आहे. एकंदर इतिहासाविषयीं व विशेषतः प्राचीन इतिहासाविषयीं हा आपला तिरस्कार वारंवार प्रगट करीत असे. ह्या थोर ग्रंथकाराच्या ज्या कित्येक विलक्षण समजुती होत्या, व हेकडपणाचे कित्येक ग्रह त्याच्या मनांत साऱ्या जन्मभर खिळून राहिले होते, त्यांपैकींच वरचा एक होय. असो; आपणांमध्येंही असे पुष्कळ ह्मणणारे सांपडतील कीं, "अहो! मागील काळाशीं आपणांला काय करायाचें आहे? ते लोक गेले, मेले, पार झाले; आतां त्यांची कर्मकटकट आपणांस कशाला हावी? बाजीरावानें दिल्ली घेतली, नानाफडणविसानें अशी अशी अशी युक्ति लढविली,--आपणांस त्यांत काय लभ्य आहे? सध्यां चाललें आहे तें खरें! ज्यांत आपला कांहीं नफाही नाहीं व तोटाही नाहीं, अशा मागच्या गोष्टी मिळवायाच्या, जुने लेख पहायाचे, वगैरे जी विनाकारण यातायात करायाची तींत काय अर्थ? साहेब लोकांस कांहीं उद्योग नसतो, त्यांचीं हीं कामें. असा रिकामा उद्योग कोणीं करीत बसावें! त्यांत निष्पन्न काय?" खरेंच! जीवमान आहे तोंवर खाऊन घ्यावें, पिऊन घ्यावें; दुपारची वामकुक्षी चुकूं देऊं नये; संध्याकाळच्या खाशा वेळीं शानदारसा पोषाक करून बाहेर पडावें; मग गंघ्याचें

दुकान, किंवा ( विद्येचा शोक अथवा सुधारणेंत पुढारीपणा दाखविणें असल्यास ) लायब्ररी, अशा ठिकाणीं चार घटका साऱ्या जगाच्या उलाढाली करून नंतर रमत रमत घरीं यावें; अशा प्रकारचा स्तुत्य आयुष्यक्रम ज्यांनीं निरंतर अबाधित चालवावा, अशा थोर लोकांपुढें बाजीराव काय आणि मोठा शिकंदर बादशहा झाला ह्मणून तो तरी काय ! ! जन्मास आल्याचें चीज जर कोणास करून घेणें असेल, तर त्यांनीं अशाच सद्गुरूंचे पाय धरावे; कां कीं, एकंदर तत्व असें त्यांनींच ओळखलें ! मग काय उशीर ! तुकारामबोवा ह्मणतात, अशांची थोरवी काय वर्णावी !—

आपणासारिखें करिती तात्काळ !
नाहीं काळ वेळ तयांलागीं ॥

असो; तर याप्रमाणें इतिहासास नाक मुरडणार वर सांगितलेले दोन प्रकारचे लोक असतात. एक वरचे वामकुक्षीवाले. यांच्या मतांत तर अर्थातच मुळींच अर्थ नाहीं; व त्यांचें मत कोणीं न मानलें तर त्यांतही त्यांस मोठी मानहानि झालीशी वाटणार आहे असेंही नाहीं ! त्यांचें चमचमीत भोजन, वामकुक्षी, तंबाखू, गप्पा यांस जोंपर्यंत कांहीं हरकत होत नाहीं, तोंपर्यंत इतर कशासही ते मोजीत नाहींत ! हा एक वर्ग, व हा फार मोठा आहे यांत संशय नाहीं. दुसरा वर्ग जॉनसनसारख्या दुराग्रही व स्थूलबुद्धि लोकांचा. यांचीं मतें इतर विषयावर केवढींही मान्य असलीं, तरी ज्यांवर त्यांनीं कधीं व्यासंग केला नाहीं व ज्यांचा आस्वाद घेण्यास त्यांचीं स्थूलबुद्धि स्वभावतःच समर्थ नाहीं; अशा विषयांवरचीं त्यांची मतें असमंजस मानण्यास कांहीं हरकत नाहीं. कित्येक इंग्लिश कवींच्या ग्रंथांवर दिलेले अभिप्राय जॉनसनचे जितपत खरे आहेत, किंवा गाण्याबजावण्यावर त्यानें आपलें मत दिलें असतें तर तें जितपत

स. ति. २५२



यथार्थ असण्याचा संभव होता, तितपतच त्याचें प्रस्तुत विषयावरचें मत ग्राह्य होय! असो; तेव्हां या दोन्ही लोकांचे आक्षेप मनास आणण्यासारखे नाहींत. आतां इतिहासाचे उपयोग कोणकोणते आहेत याविषयीं लिहितों.

८. एक तर वर सांगण्यांत आलाच आहे. कोणता? तर जिज्ञासातृप्ति. ईश्वरानेंही मनोवृत्ति मनुष्यच्या ठायीं मोठी प्रबळ ठेविली आहे. हिचा अंगचा जोर कितपत आहे, हें सुधारणेच्या काळीं चांगलें दिसून येत नाहीं. कां कीं, अशा काळीं मनुष्याच्या मनाची मूळची कळा त्याच्या शरीराप्रमाणें लोकचाराखालीं पुष्कळ दबली जाते. ह्मणजे मूळची जशी तिची स्वेच्छाप्रवृत्ति असते, तशी पुढच्या काळीं राहत नाहीं. पहा बरें, मनुष्याचा अंतरालांतील गोलांशीं काय संबंध आहे? पृथ्वी फिरत असली कीं सूर्य फिरत असला, चंद्र स्वयंप्रकाश असला कीं परप्रकाशित असला, ग्रहमालेचा मध्य पृथ्वी असली कीं सूर्य असला तारे कितीही असले, कांहींही असले, तरी त्यांत मनुष्याचें काय बरें हिताहित आहे? मागें सूर्य फिरतो असें लोक मानीत होते, आतां पृथ्वी फिरते असें लोक मानतात, ह्मणून मनुष्यें काय रोग्याचीं निरोगी झालीं कीं दरिद्याचीं संपन्न होऊन बसलीं? येवढी उठाठेव करून—दुर्भिणीची कल्पना काढून, नाना प्रकारचीं गणितें करून, निरनिराळीं प्रमाणें एकत्र करून—ज्योतिष्यांस किंवा जगास कोणता फायदा झाला?—खरें आहे. एका कवडीचाही झाला नाहीं! हाच उपदेश सर्व मनुष्यांत शहाणा ह्मणून जो निवडला गेला त्या सॉक्रेटिसानें आपल्या शिष्यांस व सर्व जगास केला. पण येवढ्या महापंडिताच्या सांगण्यानेंही लोक राहिले आहेत काय? सूर्यबिंबाचा चंद्रानें ग्रास केला कीं लोक हिंदुस्थानांत, कोणी अमेरिकेंत, कोणी दक्षिण-

समुद्रांत, धांव घेतातच कीं नाहींत? जिवावर उदार होऊन केवळ जिज्ञासाप्रेरित होत्साते तोफेच्या गोळ्यांत बसून चंद्रलोकांवर स्वारी करतात कीं नाहींत? असो; तेव्हां मनुष्यमात्राचे ठायीं जिज्ञासा ही मोठी उच्छृंखल आहे. हिचा मुळींच अभाव असता तर जगाच्या मूळच्या स्थितींत आज फारसा फरक पडताना हें उघड आहे. असो तेव्हां सांगायाचें काय कीं, अंतरालांतील दूरदूरच्या गोलां-विषयींही जर मनुष्याच्या मनांत जिज्ञासा उत्पन्न होते, तर ज्या गोलावर तो वास करतो त्यावर निरनिराळ्या ठि-काणीं काय काय वृत्तांत घडले ते समजून घेण्याची त्यास उत्कंठा होणार नाहीं काय?

९. वर सांगितलेला इतिहासाचा उपयोग सर्वांत पहिला साधा व लहान असा होय. तरी इतिहासाची प्रवृत्ति मूळा-रंभीं पडण्यास तोच कारण आहे असें दिसून येईल. त्याहून वरचढ दुसरा उपयोग म्हटला ह्मणजे नीतिबोध, सज्जनांचा जय व दुर्जनांचा अपजय असेंच जरी नेहमीं इतिहासांत आढळत नाहीं तरी एकंदरींत परिणाम असाच दृष्टीस प-डतो. शिवाय दुसरें हेंही लक्षांत येतें कीं, भलेपणानें वा-गूनही जरी नेहमीं परिणाम लागतोच असें नाहीं, तरी पण दुष्टपणा केल्यानें तर तो नाहींच नाहीं लागत! मनुष्याचें सर्व प्रकारें हित होणें तें केवळ याच मार्गानें व्हावयाचें; कुमार्गानें तें व्हावें हें वस्तुगत्याच शक्य नव्हे. याप्रमाणेंच मोठ्या प्रसंगींही ज्यांचे धैर्यबळ ढळत नाहीं असे थोर पुरुष तर विपत्तींतही जें सुख पावतात तें दुष्ट व कुत्सित मनाच्या लोकांस मोठ्या भाग्यशालीपणांतही लाधत नाहीं. सारांश, या संसाररूप महानाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपआपलीं भूमिका आटपून निष्क्रमण करतीं झालीं हें चित्तावर चांगलें ठसलें असतां चांगला मार्ग को-

णता, वाईट कोणता, हें सुज्ञ मनुष्यास सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे, हेंही कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोडक्यांत त्यास आलासा होतो; त्याच्या योगानें त्याची दृष्टि फांकते; आणि तो जर तसा समजुतीचा व दृढनिश्चयाचा असेल, तर लवकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून खलाशी लोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करतात, त्याप्रमाणें तो त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून तदनुरूप आपलें आयुष्यक्रमण करतो. याप्रमाणें इतिहासापासून सदुपदेश प्राप्त होतो; व म्हणूनच एका थोर ग्रंथकारानें ' इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय. ' असें यथार्थ म्हटलें आहे.

१० इतिहास हा मनास उन्नति व प्रसन्नत्व हीं देणारा आहे. ह्मणजे त्याच्या निरंतर वाचनानें चित्त शांत व स्थिर रहातें. आणि थोर होतें. याचें कारण उघडच आहे. एका चतुर ग्रंथकाराचें असें वचन आहे कीं, ' इतिहास ह्मणजे या जगांत जे महापुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें आहेत, ' ह्मणजे अशा पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं त्यांनींच इतिहास भरला आहे; तीं काढून निरनिराळीं केलीं तर त्यांत काय उरेल! अर्थात कांहीं नाहीं. तेव्हां आजपर्यंत या जगतीस भूषणभूत जीं रत्नें निरनिराळ्या देशांत निपजलीं त्यांचा सहवास जर अक्षयीं घडेल, तर त्यापरता लाभ कोणता? प्लूटार्क नामेंकरून एक नामांकित इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेला, त्याचा अत्यंत प्रसिद्ध व सर्व जगाचा प्रीतिपात्र झालेला असा ग्रंथ 'थोर लोकांचीं चरित्रें' या नांवाचा आहे. यांत त्यानें ग्रीस व इटाली देशांत जीं मोठमोठीं प्रकरणें होऊन गेलीं त्यांचा वृत्तांत लिहिला आहे. त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें असें म्हटलें आहे कीं,

मला या लोकांच्या उज्वळ चारित्राचें मनन केल्यापासून जो लाभ झाला तो सांगतां पुरवणार नाहीं; जेव्हां जेव्हां कांहीं अनुचित कृत्यांकडे माझ्या मनाचा कल होई, किंवा सदाचरणाविषयींचा उत्साह कमी झालासा वाटे, तेव्हां तेव्हां मी यांचीं चारित्रें वाचीं; तेणेंकरून मनाला पुन्हां हुषारी वाटे. असो; सत्समागमाचा महिमा असाच आहे. आपल्या मराठी व संस्कृत कवींनीं या महिम्याविषयीं निरनिराळ्या कथांनीं व दृष्टांतांनीं पुष्कळ लिहिलें आहे. या दृष्टांतांपैकीं तुकारामादि मराठी कवींची फार आवडती जी लोहपरिसाची उपमा ती या ठिकाणीं फार सुंदर व समर्पक होय. लोखंड मूळचें किती हलकें असतें व दिसण्यांत किती भिकार दिसतें! पण परिसाशीं वरच्यावर संघटन जसजसें घडेल तसतसें त्याचें सर्व धातूंत श्रेष्ठ व यथार्थनाम जें सुवर्ण तें बनत जातें! आणि वस्तुतः मनुष्य कसाही चांगला वाईट निपजणें हें पुष्कळ अंशीं ज्या ज्या स्थिति त्यास प्राप्त होत जातात त्यांचेंच फल असतें. कोणी कोणी तर तें सर्वथाच त्याचें फल होय असें सुद्धां ह्मणतात. इंग्लंडांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं लॉक नामेंकरून एक मोठा तत्वज्ञ होऊन गेला, त्यानें हें मत स्थापलें. या मताच्या लोकांचें ह्मणणें असें आहे कीं, मनुष्याचें मन हें आरंभीं एखाद्या स्वच्छ आरशाप्रमाणें किंवा कोऱ्या कागदासारखें शुद्ध असतें. त्यास प्राक्तनसंस्कार ह्मणजे आधींचे बरे वाईट विकार कोणतेच घडलेले नसतात. ते पुढें ज्याच्या त्याच्या स्थितिविशेषानुरूप त्यास जडून त्याचा कल चांगल्याकडे व वाईटाकडे फिरतो. असो, हें कांहींही असो. पण इतकें खचित आहे कीं, या पुढच्या स्थितीप्रमाणें मन बहुधा चांगले वाईट विकार पावत असतें. संस्कृतांत एक वाक्य आहे—

अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपश्याम्यति ।

'गवताशिवाय एखाद्या जाग्यावर जर अग्नि पडला, तर तो आपोआपच विझला जातो' याप्रमाणेंच मनुष्याचे चांगले वाईट गुण पूर्णपणें विकास पावण्यास तशा प्रकारची स्थिति त्यास अनुकूळ असावी लागते. पहा बरें, सध्यां आपल्या देशांत शिवाजीसारखा किंवा हैदरासारखा राज्यकर्ता कां निपजत नाहीं ? किंवा नानाफडनविसासारखा राज्यकारणी पुरुष कां होत नाहीं ? कारण उघडच आहे. कीं, तसे गुण असले तरी त्यांचा विकास होण्यास हल्लींच्या स्थितींत मुळींच अवकाश नाहीं. असो; तेव्हां एखाद्या आंगच्या गुणाचा उत्कर्ष व्हावयास तशी तशी स्थिति मनुष्यास अनुकूल असावी लागते या स्थितिविशेषांतील एक मोठी गोष्ट तशा मनुष्याची संगत ही एक होय. जगांत जे मोठे मोठे लोक होऊन गेले ते त्यांस तशी संगत नसती तर कधीं न होते. अगदीं आलीकडचेंच एक उदाहरण घ्या. इंग्लंडांतला आलीकडचा मोठा प्रसिद्ध ग्रंथकार जॉन् स्टूअर्ट मिल्ल, जो गेल्या वर्षी मरण पावला, त्यास जर त्याच्या बापाची संगत नसती तर त्याची बुद्धि येवढी परिपक्क झाली असती काय ? खचित झाली नसती. तो बुद्धिमानच होता, त्यापक्षीं तो कसा तरी प्रसिद्धीस येता यांत संशय नाहीं; पण एवढ्या योग्यतेस तो एरवीं कधीं चढताना. हें याच ग्रंथकारानें आपल्या नुकत्या प्रसिद्ध झालेल्या स्वरचित चरित्रांत स्वतः कबूल केलें आहे. या ग्रंथांत तो ह्मणतो कीं, बापाच्या शिक्षेमुळें मी पंचवीस वर्षे अगोदर जन्मून जितकें ज्ञान मला झालें असतें तितकें झालें. असो; याचप्रमाणें प्राचीन काळचे शिकंदर, हानिबॉल, सिपिओ इत्यादि व आलीकडचे आपल्या देशांतले थोरले बाजीराव, टिपू सुलतान यांचींही उदाहरणें देतां येतील.

तेव्हां संगतिविशेषाचें फल अचिंत्य होय. याचें तरी कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं. मनुष्य जन्मून त्यास जगांतील व्यवहार थोडेबहुत कळूं लागले ह्मणजे त्याच्या हातून कांहीं ना कांहीं तरी व्यापार अवश्य झालाच पाहिजे. त्यास सर्वथा निर्व्यापार असें कधींच राहतां येणार नाहीं. असें जर आहे तर मग त्यानें कोणतें आचरण करावें? अर्थात् जवळच्या चारचौघांचें जें पाहील तेंच. हें अगदीं स्वभावास अनुसरून आहे. यास्तव मुलांस आईबापांचे जितके गुण लागतात—त्यांतूनही विशेषतः आईचे-तितके दुसऱ्या कोणाचे लागत नाहींत. असो; तर अनुकरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति जर येवढी साहाजिक व बलवत्तर आहे, तर लहानपणापासून इतिहास, चरित्रें वगैरे वाचण्याची जर त्यास गोडी लागेल तर ती त्यास किती हितावह होईल बरें? सज्जन व थोर मनुष्यांशीं निरंतर सहवास असणें हें हजारांमध्यें एकाद्याचें कदाचित् भाग्य असेल. बाकीच्यांस वरच्या विरुद्ध लोकांशींच नेहमीं प्रसंग! तेव्हां अशांची संगति जो गुण अवश्य करील तो नाहींसा होऊन सदाचरणप्रीति व खरा थोरपणा मनांत बिंबण्यास वरच्याखेरीज दुसरें कोणतें साधन आहे? दुसरें असें कीं, वरच्यासारखे थोर लोक कोणत्याही देशांत ईश्वरकृपेनें एकादे वेळेसच उत्पन्न होतात. व तेव्हां त्यांचा वर्तनक्रम पाहून दुसरेही कित्येक त्यांचा कित्ता उचलून योग्यतेस चढतात. पण तेवढा काळ गेला कीं आटपलें! इतिहास, चरित्रें वगैरे लिहिण्याचा प्रघात नसला ह्मणजे पांचपन्नास वर्षांत त्यांची आठवणही पार बुजून जाते! मग पुढील लोकांच्या ठायीं उत्साह कसा उत्पन्न व्हावा? व देशाची पहिली थोरवी तरी कशी रहावी?—वर इतिहासाची अवहेलना करणारे जे सांगितले त्यांस येवढें विचारावें, कीं इतिहासापासून दुसरा

बिलकूल कांहीं एक फायदा नसला, तरी हाच एक काय लहान आहे? होमरकवीनें आकिलीसाचा पराक्रम वर्णिला नसता तर शिकंदर होता काय? व्यासानें पांडवांचें चरित्र गाइलें नसतें तर शिवाजी उत्पन्न होऊन त्यानें यवनांपासून राज्यश्री माघारी हरण केली असती काय? शिकंदराचा इतिहास नसता तर सीझर कशाला होता? सीझरचा नसता तर नेपोलियन कशाला होता? शिवाजी महाराजांची कीर्ति जर मागें न राहती, तर त्यांच्या पुत्राचा वध होऊन राजकुल व राजधानी शत्रूच्या कबजांत सांपडून, सर्व शून्याकर झालें असतांही, मराठ्यांनीं दिल्लीच्या अवरंगजेबास पुरेपुरेसें करून मोठ्या कष्टानें व मोठ्या शर्थेनें अहमदनगरास कशाला पळवून लाविलें असतें? थोरल्या बाजीरावसाहेबांनीं घरचें दाभाड्याचें बंड मोडून दिल्लीच्या मोगलाची व हैदराबादच्या नबाबाची खोड कशाला मोडली असती? चिमाजी आप्पानें फिरंग्यांस कशाला जेरीस आणलें असतें? राघोबा भरारी गिलच्यांस अटकेपार कशाला पळवून लावता? थोरला माधवराव साऱ्या जगास भारी असणाऱ्या इंग्रजांसही जो भारी झाला तो हैदरास वरचेवर कसा तुडवून टाकता? सरते शेवटीं भेकड, मूर्ख, बायक्या असा धनी पेशव्यांच्या कुळास अक्षय कलंक लावून पळत सुटला असतां, शत्रूवर एकटा चालत जाऊन समशेरबहादर गोखलखा अष्ट्यास कसा पडता? असो; तेव्हां अनुकरणाचें फळ कांहीं विलक्षण आहे! पण ते पुरुष होऊन गेल्यावर त्यांचें स्मरण कोणासच होत नाहीं. यास्तव इतिहास असावे लागतात; कीं देशाची स्थिति जरी अगदीं बदलून गेली तरी ते वाचून पुढेंमागें कोणास तरी त्यांपासून उत्साह व प्रेरणा प्राप्त होते. ग्रीसचें, रोमचें, व अलीकडील इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांचीं राज्यें इतके दिवस टि-

कल्याचें हें एक कारण असावें यांत संशय नाहीं. पण कोणी ह्मणतील कीं, सर्वांसच लढाऊ व राज्यकारणी पुरुष होण्याचें कोठें अनुकूल असतें? नसतें खरें. पण ह्मणून काय झालें? इतिहासाचा उपयोग कमी झाला काय? पृथ्वीवर हजारो, लाखों लोक गुरूचे उपग्रह व शनीचें कडें दुर्बिणींतून वरचेवर बघतात; मग त्यांस ते उपग्रह व कडें आपल्या ताब्यांत येतील असें वाटत असतें काय! नाहीं ते उपग्रह व तें कडें पाहून विश्व रचणाऱ्या चतुर कारागिराचें जर वैभव त्यांच्या मनांत बिंबलें, तर तो लाभ उपग्रह व कडें हीं ताब्यांत आल्यापेक्षांही शतगुणित अधिक नव्हे काय? तद्वतच नेपोलियन बादशाहाचे किंवा शिवाजीचे पराक्रम वाचून जर त्यास वाटलें कीं, अहाहा! मनुष्याच्या बुद्धीचा प्रभाव केवढा आहे :—कधीं कधीं एकट्याच मनुष्याच्या हातीं किती लोकांचें कल्याण व नाश करण्याचें असतें!—पहा! येवढा यूरोप हाताखालीं आला असतांही त्या नेपोलियनास संतोष ह्मणून झालाच नाहीं, व शेवटीं एका दीड वर्षांत त्याची काय दशा झाली! मोठमोठे राजे ज्याचे अंकित होऊन ज्यास थरथरां कांपत होते तोच दैवानें एक झोला देतांच अफाट समुद्रांत एका भयाण बेटांत जाऊन पडला, आणि जें शरीर जिवंतपणीं साऱ्या यूरोपास दणाणवीत होतें तेंच एका दगडाखालचें खणून आणून त्याच्याच राजधानींत समारंभानें पुरण्यास त्याच्या शत्रूंची परवानगी मागावी लागली! अरेरे! लक्षावधि मनुष्यांच्या प्राणांचा नाश करून यानें कोणती ज़ोड केली! येवढ्या अचाट बुद्धीबरोबर परोपकाराची इच्छा जर याचे ठायीं तिळभरही असती, तर जगाचें केवढें हित होतें!—शिवाजीचें चरित्र पहा! बापानें नावडत्या आईबरोबर पुनवडीस ठेवला असतां दादोजी कोंडदेवानें लहान-

पणीं थोडें बहुत जें त्यास कांहीं शिकविलें तेवढ्याच ज्ञानानें पुढें केवढें अकांडतांडव केलें! जे लोक मागेंही कधीं प्रसिद्धीस आले नव्हते व पुढेंही लवकरच पुनः अप्रसिद्ध झाले, ज्यांच्या अंगीं बाहेरून शरीराचें किंवा बुद्धीचेंही सामर्थ्य दृष्टीस पडत नाहीं, अशांच्या ठायीं आपणास अत्यंत उपयोगीं पडतीलसे गुण ओळखून त्यांस त्यानें आपले जिवलग संवगडे केले. त्यांच्या बळावर जी हिंदूंची राजसत्ता सुमारें हजार वर्षें अस्तास गेली होती तिचा अरुणोदय मावळच्या डोंगरांवर पुनः झाला! थरमॉपिलीच्या लियोनिडसास त्यांच्या तानाजीनें व सूर्याजीनें लाजविलें! सर्व पृथ्वीभर ज्या शहरच्या मातब्बरीची प्रसिद्धि होती, जें मोंगलांच्या राज्यश्रीचें केवळ कुंकू होतें, तें शहर त्यांनीं दोनदां सावकाश लुटलें. विजापुरास तर हं हं ह्मणतां चिरडून टाकून गर्वानें माजलेल्या मोंगलांस त्यांनीं असा उच्छाद दिला कीं, शिवाजी एक आहे कीं दोन आहेत असें त्यांस भासविलें.—तेव्हां केवढें सामर्थ्य हें! व याहीपेक्षां वाखाणण्यासारखें काय, कीं तिचा केवढा सद्व्यय झाला?—तेव्हां मोठी बुद्धि असण्यापेक्षां सदाचरणप्रीति असणें हेंच विशेष हितकारक आहे. मनुष्याच्या मनाचा असा चमत्कार आहे कीं, ‘लाभाल्लोभः प्रवर्तते’—‘जसा जसा लाभ होत जातो तसा तसा लोभही वाढतो!’ तेव्हां आहे त्यांत संतोष मानून राहणारा मजूरही मोठ्या बादशहापेक्षां सुखी असेल यांत संशय नाहीं!—याप्रमाणें शहाणपणाच्या अनेक गोष्टी जर त्यांच्या मनांत ठसून गेल्या, तर मोठा अधिकार मिळाल्यापेक्षांही त्यांस अधिक लाभ होणार नाहीं काय? असो; तर इतिहासापासून मनास शांति व उन्नतत्व प्राप्त होतें हा एक त्यापासून मोठा लाभ आहे.

## इतिहास.

लंकापतेः संकुचितं यशो यत्
यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः।
स सर्वएवाद्यकवेः प्रभावो
न कोपनीयाः कवयः क्षितींद्रैः॥

बिल्हण.

१. इतिहासापासून चवथा उपयोग मनाचें रंजन. निरनिराळ्या देशांत घडलेले वृत्तांत समजल्यानें व त्यांचें मनन केल्यानें मागें सांगितल्याप्रमाणें जिज्ञासावृत्तीचें समाधान तर होतेंच, पण जर ते इतिहास तशा शैलीनें लिहिले असतील तर त्यांच्या वाचनानें वाचकांस आल्हादही होईल. असे इतिहास ग्रंथ ग्रीस, ल्याटिन, फारशी या भाषेंत आहेत. तसेंच अलीकडे इंग्लिश भाषेंत झालेले ह्यूम, गिबन, मेकॉले यांचेही ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध आहेतच. अशा इतिहासाची भाषासरणी, यथास्थित ग्रंथरचना, कथानकाची जुळणी, गहन विचार, 'तऱ्हतऱ्हेची माहिती मध्यें घालून देण्याची खुबी, यांच्या योगानें सर्व प्रकारच्या वाचणारांस ते मान्य होतात. ज्यांस केवळ भाषाच शिकावयाची असते त्यांस तिचें अत्यंत रमणीय रूप त्यांत पहावयास सांपडतें, ज्यांस विषयाची मांडणी कशी करावी याची समजून करून घ्यायची असते त्यांस ती धाटणी त्यांतून उचलतां येते, केवळ गोष्टवेल्हाळच जे असतात त्यांस कादंबऱ्यांप्रमाणें त्यांत चमत्कृति भासते, जे तत्त्वजिज्ञासु असतात त्यांस पोक्तपणाचे व खोल असे विचार त्यांत सादर केले असतात, आणि ज्यांस चमत्कारिक व मौजेच्या गोष्टींचा संग्रह करावासा वाटतो त्यांस तो त्यांतून

सहज करतां येतो. याप्रमाणें इतिहास अनेक प्रकारांनीं मनोवेधक होतो. कादंबऱ्या वाचतांना श्रम न होतां जशी कर्मणूक होते तशीच बहुधा अलीकडील कित्येक उत्कृष्ट इतिहासांनीं होते. व यास्तवच अलीकडे इतिहास वाचण्याची प्रवृत्ति पडून तो सर्वांस सामान्यतः जितका माहीत असतो तितका पूर्वीं कधींही नसेल. ही गोष्ट दोहों तऱ्हेनें नफ्याची झाली. एक तर इतिहासाचें ज्ञान सर्वांस उपयोगीं आहे ह्मणून, आणि दुसरें असें कीं, त्यामुळें कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांकडेच जो लोकांचा पूर्वीं ओढा होता तो कमी झाला. मनोरंजनाचा दुसरा कांहींच प्रकार अनुकूळ नसल्यामुळें पूर्वीं लोकांचा कादंबऱ्यांकडेच विशेषतः भर असे; व त्यामुळें मुख्यत्वेंकरून तरुण लोकांस त्या फार अनर्थावह होत. त्या वाचणारे बहुधा तरुण वयाचेच असावयाचे. व लिहिणारेही तसेच; मग काय विचारावें? त्या वयांत अंतःकरणवृत्ति अत्यंत सुक्षोभ असल्यामुळें अद्भुत व असंभवी गोष्टींत मन रमून शृंगारवीरादि रस जे त्यांत अतिशयोक्तीनें वर्णिले असतात त्यांत तल्लीन होऊन मन बहकून जाई. डॉन् क्किपसोट किंवा ' रासेलसांतील ' ज्योतिषी यांची जशी अवस्था होऊन गेली तशाच प्रकारची या वाचकांची होण्याचा संभव असे. ह्मणजे विलक्षण कल्पना व चमत्कारिक तरंग मनांत नेहमीं भरून लौकिक व्यवहारास हे मनुष्य अगदीं कामाचे नाहींत असे होत. शिवाय मन बिघडण्यास. व त्यास अगदीं निःसत्व करून टाकण्यासही कादंबऱ्या कारण होत. याचें उदाहरण आपल्या मराठींतील कित्येक कादंबऱ्या व नाटकें आहेत. व इंग्लंडांत सर वॉल्टर स्कॉट यांच्या पूर्वीं जे कित्येक कादंबरीकार होऊन गेले. त्यांपैकीं मोठे नामांकित होते ते सुद्धां महा चावट होते. पण या चावट-

गिरीचा अगदीं कळस झालेला ज्यास पहाणें असेल त्यानें ' डिक्यामेरॉन ' ' हेपट्यामेरॉन हें ग्रंथ पहावे. पहिला बोके-शियो नामक इटालियन ग्रंथकारानें रचिला, व दुसरा त्याच्या नमुन्यावर एका फ्रेंच बाईनें रचिला. पहिला ग्रंथ रचण्याचा प्रसंग मोठा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. फ्लॉरेन्स ( हें नांव विशेषतः इकडच्या लोकांच्या मनाशीं पुष्कळ दिवस खिळून राहील ! ) या नांवाच्या शहरीं एके समयीं मोठी पटकी उठली असतां तेथें सात तरुण स्त्रिया व तीन तरुण पुरुष अशीं दहाजणें गांवांबाहेर एका बागेंत जाऊन कांहीं दिवस राहिलीं. तेथें त्यांनीं परस्परांस करमणूक करण्याकरितां ज्या चमत्कारिक गोष्टी सांगितल्या त्या एकंदर मिळून हा ग्रंथ झाला आहे. दुसरा ग्रंथ तर वर सांगितल्याप्रमाणें एका स्त्रीनेंच लिहिला असून त्यांत सांगितलेल्या कित्येक गोष्टी तिनें स्वानुभवावरून लिहिल्या आहेत ! असो; इतकी बारीक माहिती येथें सांगण्याचा हेतु इतकाच कीं, या दोन ग्रंथांवरून सर्व सुधारणांचें अगर जें यूरोपखंड, सर्व सदाचरणाचें आगर जो ख्रिस्ती धर्म, सर्व सद्गुणांचें अगर ज्या तिकडील कुलीन स्त्रिया, त्या सर्वांचें किंचित् स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षांत यावें ! पण ही गोष्ट इटालियन व फ्रेंच लोक, जे नखरेबाज व इष्की ह्मणून साऱ्या युरोपखंडांत निवडले आहेत त्यांविषयीं झाली. आतां आपले धनी इंग्रेज लोक, ज्यांच्या मतें नीति व सदाचरण यांचें केवळ निधानच ते होत, त्यांच्यांत तरी वरील पुस्तकांचा कितपत तिटकारा आहे तो पाहूं. यास प्रमाण दोनच गोष्टींचें पुरें आहे. पहिलें हें कीं, त्यांचे आद्यकवि जे चॉसर त्यांनींच ' डिक्यामेरॉन् ' मधल्या कित्येक गोष्टींचें कवितारूपानें निबंधन केलें आहे. यावरून त्या इटालियन ग्रंथाचा सदाचरणी इंग्लिश लोकांत किती लवकर व केवढा

प्रसार झाला हें समजतें. दुसरी गोष्ट अगदीं अलीकडे ड्रायडन् व पोप यांनींही तोच प्रकार केला आहे. असो; येथें लेखणीनें बरीच धांव घेतली; पण वरील माहिती आमच्या कोणत्याही वाचकांच नकोशी वाटेल असें आह्मांस वाटत नाहीं! तेव्हां मन बिघडणें हा कादंबऱ्यांपासून होणारा एक अनर्थ आहे. दुसरा अनर्थ मनाचें दौर्बल्य. कादंबऱ्याच वाचण्याची ज्यास एकदां चटक लागते त्यास मग दुसरें कांहींच वाचावेंसें वाटत नाहीं. कादंबऱ्या भराभर वाचायाच्या, व त्यांत समजण्यासही कांहीं कठीण नसतें; यास्तव विद्या काय ती हीच असें वाचणारास वाटूं लागून त्याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ त्यांचा त्यास त्रासच येऊं लागतो. त्यांत शिकणारानें आपली मति शिरकवावी लागते. कारण, ते कठीण व गहन विषय पडले; पण तें यांच्यानें होत नाहीं. अशी एकदां संवय पडून गेली ह्मणजे मग ती कधींही मोडत नाहीं. याप्रमाणें बाजवीपेक्षां जास्त असा हा कादंबऱ्यांचा नाद लागला असतां तो मनास अपाय करतो. तें अगदीं निःसत्व होऊन कोणतेंही श्रमाचें काम त्यास झेपेनासें होतें.

पण मनोरंजक इतिहासांच्या योगानें वरील तिन्ही अनर्थ टळून कादंबऱ्यांचें तर कार्य होतें. त्यांत निवळ सत्यच लिहावयाचें असतें, यास्तव भूतराक्षसांच्या 'नाइट' लोकांच्या, अशा विलक्षण प्रकारच्या अद्भुत गोष्टी त्यांत येत नाहींत, तरी पण त्यांत अद्भुत रस नसतो असें नाहीं. नेपोलियनासारख्या वीरांच्या, वॉटसारख्या कल्पकांच्या, बेकनसारख्या तत्त्वज्ञांच्या चरित्रांत अद्भुतरसास काय उणीव आहे! पण दोहोंत फरक किती आहे तो पहा! पहिल्या वाचून जसे पुष्कळ भ्रमिष्ट झाले तसे दुसऱ्यांच्या योगानें कधीं तरी होतील काय? दुसरी गोष्ट मन बिघडणें.

हेंही इतिहासवाचनानें होण्याचा अगदीं संभव नाहीं हें उघडच आहे. तिसरें मनाचें क्षीणत्व. हें इतिहासवाचनानें होण्याचा संभव मुळींच नाहीं, हें तर काय, पण जसजसा इतिहासाचा कोणास नाद लागत जाईल तसतसें त्याचें मन विशाल व विचारक्षमच होत जाईल. फार तर काय, पण त्यास हा नाद लागला हेंच वरील दोहोंचें मोठें चिन्ह होय! तर याप्रमाणें इतिहास हा सर्व प्रकारें हितकर असून कादंबऱ्यांप्रमाणें त्यापासून कोणताही अपाय होण्याचा संभव नाहीं. शिवाय सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, इतिहास अक्षरशः खरा असल्यामुळें त्यांतील गोष्टी जशा मनावर पक्क्या ठसल्या जातात, तशा कादंबऱ्यांतील ठसत नाहींत.

२. इतिहासापासून पांचवा उपयोग राज्यकारणी पुरुषांस ह्मणजे मुत्सद्यांस होय. इतिहासाचा मुख्य उपयोग, वास्तविक पाहतां हाच असून याचकरितां इतिहासकार पूर्ववृत्त लिहून ठेवितात. व्यक्तिभूत मनुष्यास जितका चरित्रांचा उपयोग तितकाच मुत्सद्यांस इतिहासाचा; ह्मणजे 'पुढच्यास ठेंच मागला शहाणा' या मराठी ह्मणीप्रमाणें पूर्वीं होऊन गेलेल्या मनुष्यांचा अनुभव जसा पुढच्यांस उपयोगीं पडतो, त्याचप्रमाणें या पृथ्वीवर आजपर्यंत जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांचा अनुभव हल्लींच्यांस कामास येतो. राज्यास हितकर गोष्टी कोणत्या, अपायकारक कोणत्या, त्यावर अनिष्टें आलीं असतां कोणत्या युक्तिप्रयुक्तीनें त्यांचें निवारण करावें, तंटेबखेडे कशामुळें उत्पन्न होतात, प्रजेस सुखी ठेवण्याचे मार्ग कोणते, कायदेकानू कशा प्रकारचे असावे, वगैरे शेंकडों गोष्टी पूर्वीच्या इतिहासावरून सध्यांच्या राज्यकर्त्यांस समजल्या आहेत. एखादें जुनाट वडाचें झाड अवाढव्य विस्तार पावून शेवटीं वठलें असतां त्याचे नवे सोट जसे वाढत जाऊन मूळच्या

झाडाच्या जागीं होतात, त्याचप्रमाणें रोमच्या अफाट पसरलेल्या बादशाहींतून हळू हळू आलीकडचीं युरोपांतील अनेक राज्यें उद्भवलीं. भाषा, रीतरिवाज वगैरेचें मूळ जसें तें राज्य होय तसेंच राज्यव्यवस्थेचा पायाही सध्यांच्या राष्ट्रांचा तेथपासूनच आहे हा. बळकट आधार नसता, तर युरोपाची स्थिति आज कोणत्या प्रकारची असती हें सांगणें कठीण आहे! पहा बरें, पंधराव्या शतकांत ग्रीक व रोमन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रसार युरोपभर होतांच त्या खंडांतील सगळ्या राष्ट्रांस एकदम किती जोर आला! हरएक गोष्टींत तेथील लोकांचा पगडा साऱ्या पृथ्वीवर जो तेव्हांपासून बसला आहे त्यास मुख्य कारण पाहूं जातां वर सांगितलेलें प्राचीन राष्ट्रांनीं ग्रंथांत सांठवून ठेविलेलें अमोलिक ज्ञानभांडार एकदम त्यांच्या हातांस जें लागलें तेंच होय. राज्यरीति, सैन्यव्यवस्था, कायदेकानू वगैरे सर्व वरील जुन्या लोकांमध्येंच पूर्णदशेस आलीं असल्यामुळें तीं अलीकडील राष्ट्रांस आयतींच उपयोगीं पडलीं; तेव्हां हा त्यांस केवढा लाभ झाला? पूर्वीं नशिरवान नामेंकरून एका पारसदेशाच्या राजानें मुद्दाम एक वकील हिंदुस्थानांत पाठवून आपल्या संस्कृत 'हितोपदेशा' चें फारशी भाषेंत भाषांतर करविलें; रोमच्या सेनेट सभेनें तसेंच तीन वकील आथेन्स शहरास पाठवून तेथून सोलनचे कायदे आणविले. लैकर्गस हा स्पार्टन लोकांस राज्यव्यवस्थेचे नियम बांधून द्यावे या उद्देशानें एशियामैनर, इजिप्ट या दूरदूरच्या देशांत जाऊन हिंदुस्थानांतही आला होता असें ह्मणतात— असे दीर्घ प्रयत्न त्या वेळच्या लोकांस राज्यनीतिविषयक ज्ञान मिळावयास पडत असत! आणि तेवढेही त्या ज्ञानाची योग्यता जाणून लोक करीत! मग अलीकडच्या हजारों नव्या सोईच्या योगानें तेंच अमोलिक ज्ञान जर सर्वांस

सुलभ झालें आहे, तर हा लाभ लहानसान काय? मागें इतिहासाचे जे आक्षेपक सांगितले ते एवढाही विचार करीत नाहींत, कीं मूळाशिवाय जशी झाडाची स्थिति संभवत नाहीं, किंवा पायावांचून जसें घर राहणें अशक्य, त्याप्रमाणेंच प्राचीन स्थितिशिवाय कोणत्याही राष्ट्राची त्या त्या वेळची नवी स्थिति आली नसते. नुसत्या वरवर पाहणाराची दृष्टि मूळापर्यंत न पोंचल्यामुळें त्यास वाटतें कीं, सध्यां जें रूप दिसतें आहे तें स्वयंभूच आहे; यास आदिकारण किंवा आधारभूत असें कांहींच नाहीं. ही मूर्ख समजूत मनांत धरून असे लोक आपल्या अज्ञानास, अरसिकतेस किंवा आळसास इतिहासाचा मुळीं तिरस्कारच करून लपवूं पाहतात. असो; तेव्हां एखाद्या राष्ट्राविषयीं पूर्ण साद्यंत ज्ञान ज्यास संपादन करावयाचें असेल त्यास त्याची त्या वेळचीच स्थिति पाहिल्यानें तें कधीं होणार नाहीं. अगदीं मूळारंभापासून कसकसे फेरफार होत गेले ते पूर्णपणें जेव्हां तो लक्षांत आणील तेव्हांच त्या वेळच्या स्थितीविषयीं त्यास यथार्थ ज्ञान होईल. तसेंच त्याच्या भावी स्थितीविषयीं जर त्यास अटकळी बांधायाच्या असतील तर तेंही वरील समग्र ज्ञान असल्याखेरीज त्याच्यानें होणार नाहीं.

३. इतिहासाचा शेवटला एकंदर उपयोग ह्मटला ह्मणजे मनाचें पोषण होय. ह्मणजे त्याच्या वाचनानें व मननानें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ दशेस पोंचतात. एक तर स्मरणशक्ति, शक, मिति, स्थलांचीं नांवें, मनुष्यांचीं नांवें, एकंदर मजकूर हीं अगदीं बरोबर ध्यानांत ठेवावीं लागल्यामुळें या शक्तीचें काम पडून ती उत्तरोत्तर अवश्य वाढत जाते. दुसरी कल्पनाशक्ति. इतिहास ह्मणजे अर्थातच गत गोष्टींचा वृत्तांत असल्यामुळें तो मनांत यथा-

स्थित आणण्यास कल्पनेचें काम पडतें. ज्या काळचा, ज्या देशाचा इतिहास वाचायचा, त्याची विशेष स्थिति पूर्णपणें लक्षांत आल्यावांचून तो कधीं समजत नसतो; यास्तव तसें होण्यास वाचणाराची कल्पनाशक्ति चांगली चालत असावी लागते. ही चलाख कल्पना व मोठी पोक्त किंवा सूक्ष्मबुद्धि हीं एक नव्हत. यास्तवच कविता, कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांचा तिरस्कार करणारे जसे मोठे बुद्धिमानही आढळतात. तद्वतच मागें सांगितल्याप्रमाणें जॉनसनसारखे इतिहासास तुच्छ करणारे पंडितही आढळतात. पण या त्यांच्या अवहेलनेनें ते स्वतःस जितका अपाय करून घेतात तितका वरील कवितादिकांच्या अधिदेवतांस होत नाहीं! त्यांचें मनोहर सौंदर्य लेशमात्रही कमी होत नाहीं, व त्यांच्या रसलुब्ध खऱ्या भजकांतूनही एकाची सुद्धां भक्ति लवमात्रही उडत नाहीं. हे अवहेलना करणारे मात्र कल्पनेचे जड ठरून वृद्धप्रमदा न्यायानें उपहास्य होतात. पुरूरवा राजानें उर्वशीस प्रथमच पाहिलें असतां तिला निर्माण केल्याच्या संबंधानें तो ब्रह्मदेवास उद्देशून जें ह्मणतो तेंच अशा पंडितांस निराळ्या संबंधानें लागेल! असो. तेव्हां इतिहास त्यांतूनही विशेषतः दूरच्या देशांचा किंवा काळाचा यथास्थित समजण्यास व त्याची पुरतेपणीं गोडी लागण्यास वाचकाची कल्पना जागृत असली पाहिजे. असें असल्याविना त्या त्या इतिहासपात्राशीं तादात्म्य पावून तो तो वृत्तांत केवळ प्रत्यक्षता मनास भासणें हें घडत नाहीं. तेव्हां ही शक्ति इतिहास वाचणाराच्या अंगीं मूळची असली पाहिजे. ती असली ह्मणजे मग अर्थातच याच वाचनानें ती पुढें वृद्धिंगतही होत जाते. इतिहासांत नानाप्रकारचे देश, पुरुष, प्रसंग यांचें वर्णन असल्यामुळें कल्पनाशक्तीस रमण्यास हवा तेवढा अवकाश सांपडतो; व त्यामुळें तिचें अर्थातच अधिकाधिक

पोषण होत जातें. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, इतिहासांतील हकीकत सगळी अक्षरशः खरी असल्यामुळें—कारण तशी ती असेल तरच तो इतिहास—कादंबऱ्यांच्या असत्यतेमुळें जो एके रीतीनें त्यापासून मनास खेद होतो तो यापासून होत नाहीं. पहा बरें, 'आरबी भाषेंतील गोष्टीं' तल्या सिंदबाद दर्यावर्दीच्या निरनिराळ्या सफरी वाचल्या असतां मनास मोठा चमत्कार वाटून कल्पनाशक्ति त्यांत अगदीं चूर होऊन जाते ! पण काय ? वाचणें संपतांच लागलेंच मनांत येतें कीं, या सर्व गोष्टी मोठ्या मौजेच्या खऱ्या, पण शेवटीं काय—येथून तेथून खोट्या ! पण तेंच कोलंबसाच्या सफरी वाचाः ह्मणजे मनाची कशी स्थिति होते ! पहिल्याच्या सफरी आजपर्यंत लक्षावधि लोकांनीं वाचल्या असतील, व तशाच दुसऱ्याच्याही वाचल्या असतील; पण पहिल्या वाचल्याबरोबर कोणी मनुष्य गलबत तयार करून त्याच्या सारखे हिरे आणण्यास निघाला असेलसें वाटत नाहीं; पण दुसऱ्यांचा परिणाम काय झाला तो कोणासही—विशेषतः हिंदूंस तर—सांगयास नकोच ! त्याच जगत्प्रसिद्ध पुस्तकांत अल्लाउद्दिनाच्या वाड्याचें वर्णन आहे; आणि इतिहासांत ताजमहालाचें वर्णन आहे. पण दोहोंच्या वाचनानें वाचकांच्या मनांत किती भिन्न वृत्ति उद्भवतात ! याप्रमाणेंच यक्षांनीं, राक्षसांनीं केलेलीं अद्भुत कृत्यें ही त्यांत घातलीं आहेत; पण तीं वाचून मनास कांहीं वेळ करमणूक होते इतकेंच. इकडे वायुवेगानें एक ठोका मुंबईस तर दुसरा ठोका लंडनास अशी मनाच्या वेगानें धावणारी वीज, हत्तीच्या अंगासारख्या धोंडी एकावर एक रचून उभारलेले मनुष्यकृतीचे पर्वत—कीं जे आतां जितके जुने भासतात तितकेच हिराडोटसास भासले—, डोंगर कोस कोस पोंखरून कोरून काढलेलीं विशाल मं-

दिरें—ज्यांनीं आपल्या प्रचंडतेपुढें निष्ठुर, हेवेखोर व दुराग्रही अशा यवनांसही हात टेंकायास लावून त्यांकडून त्यांचा दुष्ट हट्ट सोडविला—, इत्यादि मानवीबुद्धीचे व प्रयत्नाचे अद्भुत प्रभाव जेव्हां मनुष्य पाहतो तेव्हां त्यास वरील खोट्या गोष्टी पोरकट वाटूं लागतात! असो; तेव्हां सांगावयाचें तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या मनास स्वभावतः सत्य आवडत असतें, यास्तव खऱ्या इतिहासाकडे त्याची प्रवृत्ति जितकी सहज व जितक्या प्रेमानें होईल तितकी कल्पित कादंबऱ्यांकडे होणार नाहीं. व म्हणूनच मनुष्याची कल्पना इतिहासवृत्तांतांत मोठ्या आवडीनें निःशंक रमते; कारण त्यांत असत्यतादोष मुळींच नसल्यामुळें तींत यथेच्छ विहार केल्याचा तीस अगदीं शीण वाटत नाहीं. तसेंच इतिहासांतील विषय पुष्कळ प्रत्यक्ष इंद्रियगोचर होण्यासारखे असल्यामुळें त्यांचा ठसा मनावर जितका ठळठळीत उठण्यासारखा असतो तितका कल्पित कथांतील विषयांचा अर्थातच नसतो, असो; तर याप्रमाणें कल्पनाशक्तीस रंजविण्याच्या संबंधानें कादंबऱ्यांत व इतिहासांत इतकें अंतर आहे. तेव्हां इतिहासाच्या वाचनानें वाढली जाणारी दुसरी मानसिकशक्तिकल्पना होय. तिसरी विचारशक्ती. ही इतिहासाच्या ज्ञानानें वाढते हें अगदीं उघड आहे.—फार तर काय, पण हें नुसतें लिहिणें ह्मणजे सुद्धां 'सूर्य तेजाळ आहे,' 'पाण्याच्या अंगीं प्रवाहित्वधर्म आहे,' इत्यादि वाक्यांप्रमाणें अत्यंत प्रसिद्ध अर्थाचा अनुवाद केल्याप्रमाणें असमंजस दिसतें. तथापि ती कां वाढते व कशी वाढते यावर अंमळ विस्तार करणें जरूर आहे. एक तर इतिहासांत तऱ्हेतऱ्हेची माहिती असल्यामुळें मनाच्या कोठारांत पुष्कळ नव्या गोष्टींचा भरणा होतो. त्या तर्क चालविण्यास किंवा हातीं घेतलेल्या विषयास वैचित्र्य किंवा

वरील कलमांत सांगण्यांत आलें आहे. पण तें खुद्द राज्य-कर्त्यांसच लागू होतें. प्रस्तुत प्रसंगीं हेंही दाखवा-वयाचें आहे कीं, ज्याच्या हातीं राज्याधिकार लहान थोडा सुद्धां नाहीं अशा घरीं बसून असणाऱ्या सुखवस्तु मनुष्यासही तशा प्रकारचें मार्मिक ज्ञान इतिहासापासून होईल. सध्यां इंग्लंडांत वगैरे अशा प्रकारचे विचार करणारे व अशा विषयांवर ग्रंथ लिहिणारे लोक सगळे मुत्सद्दीच असतात असें नाहीं; तर वर सांगितले तसे सुखवस्तु अस-णारे लोकही अशा विचारांत मग्न असतात. तेव्हां हा विषय राजकारणी पुरुषांचाच केवळ आहे असें नव्हे; अगदीं सामान्य मनुष्यांसही तो विचारार्ह आहे. राजप्रकारांपैकीं उत्कृष्ट कोणता, किंवा अमुक अमुक देशास कोणकोणता विशेष हितकर; प्रजेस राजानें अगदीं अटकावांत ठेवावें कीं मोकळीक द्यावी, द्यावी तर कोठपर्यंत, राजाचें हित होत असलें तर अनीति आचरावी कीं नाहीं, आचरली असतां तिचा परिणाम काय होईल; देशाच्या स्थितिविशेषाचे परि-णाम एकंदर लोकांच्या मनावर व स्थितीवर काय होतात, राज्याचा आणि धर्मखात्याचा कितपत संबंध असावा; राजानें प्रजेवर धर्माचे बाबतींत सक्ती करावी कीं करूं नये; अशा-रीतीचे शेंकडों विषय एकंदर सर्व लोकांच्या संबंधाचे आहेत. यास्तव यांवर इंग्लंड वगैरे देशांतून सारखी वाटाघाट चालू आहे. गेल्या शतकाच्या शेवटीं फ्रान्स देशांत जी मोठी धामधूम झाली त्या वेळेस सर्व यूरोप व अमेरिका अगदीं गलबलून गेली; व सर्वांच्या तोंडीं लोकसत्ताक संस्थान चांगलें कीं एकराजक चांगलें हा वाद झाला. त्या प्रसंगीं या मोठ्या विषयावर शेंकडों ग्रंथ झाले; पण ते आतां सर्व बुडून वि-ख्यात वक्ता जो बर्क त्याचा ग्रंथ ‘ फ्रान्सच्या राज्यक्रांतीवर वि-चार’ एवढा मात्र अजून सर्वत्र प्रसिद्ध आहे. या ग्रंथावरून त्या

थोर तत्त्वज्ञाची विशाल बुद्धि स्पष्ट दिसून येते. या ग्रंथाविषयीं दुसरी विशेषतः सांगावयाची गोष्ट काय कीं, त्यांत ज्या कित्येक गोष्टींविषयीं मागील इतिहासाच्या अनुभवावरून त्या ग्रंथकारानें भाकीत केलें होतें तें पुढें बरोबर मिळून आलें, असो; वरील शेवटल्या गोष्टींवरून इतिहासाची थोरवी सर्वांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं- आणि सर्वांच्या, विशेषतः राजकर्त्यांच्या, उपयोगीं इतिहासाचें ज्ञान किती पडण्यासारखें आहे हेंही त्यावरून दिसून येईल. कोणी कोणी तर यावरून असेंही ह्मणतात कीं, कांहीं काळानें इतिहासज्ञानानें पूर्वींच्या अनुभवावर पुढें अमुक अमुक देशाची कसकशी स्थिति होईल याविषयीं अगोदर भाकीत करण्याची सुद्धां शक्ति येईल. असो; याविषयीं आणखीही एका प्रकारें विचारशक्ति वाढते. तो हा कीं, सगळ्या जगाचा इतिहास पहिल्यापासून आजपर्यंत सगळा एकदम मनांत आणला असतां जगदीशाचें वैभव त्यांत दिसून येतें. अगदीं प्राचीन राष्ट्राची मूळची स्थिति कशी होती ती व पुढें क्रमाक्रमानें कालगत्या कशी पालटत गेली, आणि असें होतां होतां हल्लींच्या काळीं जग कोणत्या स्थितींत येऊन पोंचलें आहे, याचा जो यथास्थित विचार करील त्यास एकंदर जगाच्या राहटीचा रोंख सुधारणुकेकडे आहे असें खास दिसून येईल. या ह्मणण्यास रानटी लोकांनीं रोमन बादशाहीची धुळधाण करून टाकली, ख्रिस्ताच्या जन्मभूमिनिमित्त कोट्यावधि यूरोपियन लोक मरून शेवटीं त्यांसच मुसलमानांनीं माघारीं पिटून लावलें, फ्रान्स देशांत दंगा होऊन त्याची व त्याबरोबर सगळ्या यूरोपखंडाची नासाडी झाली, वगैरे गोष्टी सकृद्दर्शनीं विरुद्धशा वाटतात; पण याच अनर्थांचे पुढें कसे परिणाम झाले याचा जो अंमळ विचार करील त्यास

कळून येईल कीं, ते अनर्थ केवळ तात्कालिक असून त्यापासून जगाचें चिरकाल कल्याण झालें आहे. सध्यां जी पृथ्वीवरील सुधारलेल्या देशांची स्थिति आहे, तिजमध्यें व चारपांचशें वर्षांमागें जी होती तींत जमीन अस्मानचा फरक झाला आहे असें म्हटलें असतां चालेल. हल्लीं अगदीं सामान्य मनुष्यास अशीं शेंकडों सुखें व सोई प्राप्त झाल्या आहेत, कीं ज्या त्या वेळीं मोठ्या बादशाहास अनुकूळ नव्हत्या, सध्यां पोरांसोरांस अशा कित्येक गोष्टी माहीत आहेत, कीं ज्या त्या वेळच्या मोठमोठ्या पंडितांच्या व तत्त्वज्ञांच्या स्वप्नींही कधीं आल्या नसतील. प्राचीन काळीं पक्षवायुग्रस्त शरीराप्रमाणें जगाची अवस्था होती; ह्मणजे एका भागाचें सुखदुःखज्ञान दुसऱ्यास पोंचण्यांचा बिलकूल मार्ग नसे, यास्तव जवळजवळचे देश सुद्धां परस्परांविषयीं उदासीन असत. ग्रीक लोकांचें व पारसीकांचें युद्ध अनेक वेळां मोठ्या निकराचें झालें, पण एकीकडे रोमन वगैरे लोक व दुसरीकडे हिंदु वगैरे अगदीं गार होते, तसेंच दुसऱ्या पक्षीं हानिबलानें रोमचें राज्य हालवून दिलें, किंवा इकडे बौद्धधर्मी लोकांस ब्राह्मणांनीं तिबेटांत, लंकेंत, चिनांत हद्दपार करून घालविलें, पण ग्रीक लोक आपल्या ठिकाणीं स्वस्थ. पण आतां कसा चमत्कार आहे तो पहा! अमेरिकेंत लोक भांडतात—एक होतात; आणि त्यांच्या संबंधानें पातालवासी जे मुंबईचे शेटसावकार ते त्या भांडणाच्या योगानें एकदम कोट्याधीश होतात, आणि भांडण एकाएकीं मिटतांच घरोंघर शेणाचे दिवे लागतात!—सारांश, तारायंत्राची तार जशी सध्यां पृथ्वीच्या एका टोंकाशीं हालविली असतां दुसऱ्या टोंकापर्यंत हालत जाते, त्याप्रमाणें एका भागाचें सुखदुःख तत्क्षणीं दुसऱ्या भागाच्या अनुभवास येतें; किंवा वरचें सादृश्य येथें घेतलें तर, नि-

रोगी मनुष्याच्या शरीराच्या कोणत्याही भागास झालेलें ज्ञान जसें तत्क्षणीं सार्वत्रिक होतें तसा प्रकार होतो. असो; तेव्हां हा सर्व प्रकार जेव्हां लक्षांत येतो, व एकंदर जगाचा क्रम दिवसेंदिवस सज्ञान व सुखी होण्याचा आहे असें त्यावरून समजतें, तेव्हां धर्मशील पुरुषांस मोठी उमेद येऊन त्यांची परमेश्वराचे ठायीं भक्ति दृढ होते.

याप्रमाणें या अचाट विषयाचें आमच्या वाचकांस किंचित् दिग्दर्शन करविलें. या विषयास साजेसें पूर्ण निरूपण करणें ह्मणजे सामान्य मनुष्याचें काम नव्हे. त्यास ग्रंथावलोकन पुष्कळ पाहिजे, जगाचा अनुभवही पुष्कळ हावा, आणि शिवाय विषयप्रतिपादन करण्याची शैलीही उत्कृष्ट साधलेली पाहिजे. हीं सर्व प्रस्तुत लिहिणाराच्या अंगीं आहेत असें त्यांस अगदीं वाटत नाहीं, परंतु तीं सध्यांच्या वाचकांच्या मानानें पाहतां त्यांसही हवीं आहेत, किंवा त्यापासून त्यांस हल्लींच्या स्थितींत उपयोग होणार आहे, असेंही पण त्यांस वाटत नाहीं, वाचकांचें ज्ञान व विचारशक्ति जसजशी वाढत जाते त्याच मानानें त्यांची सेवा करण्यास तसे ग्रंथकारही अवश्य निपजत जातात; यास्तव आमचे इकडील वाचक इंग्लंडांतील वाचकांच्या तोडीचे होताहेत तोंपर्यंत आपणांत बर्क्, मेकॉले, मिल्ल यांसारखे लिहिणारे खास निपजतील यांत संशय नाहीं. या दोन्ही गोष्टी परस्पर साक्षेप होत हें उघडच आहे. असो; तेव्हां सध्यांच्या स्थितीप्रमाणें आमच्या मराठी वाचकांस प्रस्तुत निरूपण पुरे आहे असें आह्मांस वाटतें, या व मागील अंकांत सांगितलेले इतिहासाचे उपयोग नीट मनांत भरून त्याच्या अभ्यासाकडे जर त्यांतून कित्येकांची प्रवृत्ति होईल तर या लेखाचे श्रम फुकट गेले असें होणार नाहीं.

येथवर इतिहासाविषयीं सामान्यतः विचार झाला. पु-

ढील अंकांत विशेषत: आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं चार शब्द बोलूं.

—:०:—

## इतिहास

**न यत्र स्थेमानं दधुरतिभयभ्रांतनयना**
**गलद्दानोद्रेकंभ्रमदलिकदंबाः करटिनः।**
**लुठन्मुक्ताभारे भवति परलोकं गतवतो**
**हरेरद्य द्वारे शिवशिव शिवानां कलकलः**

भामिनीविलास,

मागील अंकाच्या शेवटीं सुचविल्याप्रमाणें यांत आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं—ह्मणजे या विषयावर इंग्रेजींत व मराठींत जे ग्रंथ आहेत ते कसे आहेत, सध्यां एकंदर लोकांस इतिहासाचें ज्ञान कितपत आहे, त्याची योग्यता त्यांस कितपत कळते, वगैरेविषयीं—लिहावयाचें आहे. आतां या विषयासच खुद्द आरंभ करावयाच्या पूर्वीं एका मोठ्या गोष्टीविषयीं बरेंच लिहिलें पाहिजे. ही गोष्ट हिंदुस्थानाविषयीं एकंदर जगाचें मत. हें चांगलें लक्षांत आलें असतां पुढील विषय पुरतेपणीं ध्यानांत येण्यास अगदीं सोपें पडेल.

१ अलीकडे पन्नास पाऊणशें वर्षांत या देशाची स्थिति मोठी चमत्कारिक ह्मेऊन गेली आहे. त्यास फार दिवसांनीं मोठ्या सुदैवानें जें स्वराज्याचें वारें लागलें होतें तें एकाएकीं नाहींसें होऊन तो हल्लीं एका टोंकापासून तों दुसऱ्या टोंकापर्यंत परराज्याच्या सत्तेखालीं आला आहे. असें पूर्ण पराधीनत्व त्यास यापूर्वीं कधींही आलें असेलसें दिसत नाहीं. आणि याहूनही विशेष खेदास्पद काय कीं, हींतून मुक्त

होऊन त्यास पुनः वर डोकें उचलण्याचा बहुधा प्रसंगही इतःपर येईलसा वाटत नाहीं. सध्यांच्या अत्यंत कष्टावस्थेंत इंग्रेजांच्या तलवारींच्या तिखट धारांशीं दयार्द्रतेचा जो कांहीं थोडा बहुत अंश मिश्रित असेल तेवढेंच बहुतकरून आह्मांस त्राण उरलें आहे! असो; पण हीही दशा कदाचित् सह्य होती. कांकीं, 'निचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' या न्यायानेंच एकंदर जगाची राहटी चालली आहे. जो मनुष्य, जें कूळ, किंवा जें राष्ट्र आज भाग्याच्या परम शिखरास चढलेलें असतें, तेंच उद्यां एकाएकीं डबघईस येऊन परवां त्याचा मागमूसही मागें रहात नाहीं. पहा बरें, 'ग्रीक' या नुसत्या नांवाबरोबर किती कल्पना एकदम मनांत उभ्या राहतात. ज्या देशैकनिष्ट वीर्यापुढें शर्तीवर ज्याचें असंख्यात सैन्य भुसासारखें उडून गेलें, तें वीर्य; सारें जग अजूनही ज्याच्या योगानें थक्क होतें असें वाक्चातुर्य व बुद्धि; मोठमोठ्या राजांस ज्याचा धाक पडावा असें उत्साहोद्दीपक वक्तृत्व; प्रत्यक्ष पाषाणास बोलता चालता करण्याची अपूर्व करामत, इत्यादि कल्पना वरील नांवाच्या केवळ उच्चाराबरोबर एकसमयावच्छेदेंकरून मनांत प्रवेश करतात! व यामुळेंच हें नांव आजपर्यंत सर्वांच्या कानांस अमृतासारखें मधुर लागत आलें आहे. फार तर काय, पण या चिमुकल्या देशाचा—कीं ज्याचा एकंदर विस्तार येथील एकाद्या जिल्ह्या इतका सुद्धां नसेल, त्याचा—इतिहास सर्व जगास एकाद्या महातीर्थाप्रमाणें पावन व तारकच जणों काय आहे. यानेंच नुकतें सगळ्या युरोपास दीर्घकालिक महानिद्रेंतून एकदम जागविलें, व त्याचा प्रचार व प्रसार जेथें जेथें होत जाईल तेथें तेथें त्याच्या मागोमाग विद्या व कला या आल्याच असें समजावें. आजवर जे यूरोपांत व अमेरिकेंत थोर थोर लोक होऊन गेले

त्यांपैकीं ज्याच्या बुद्धीनें येथून पेट घेतला नाहीं असा कदाचित् एकही मनुष्य सांपडणार नाहीं! असो, पण याच ग्रीक लोकांची लवकरच काय दशा होऊन गेली! ज्या मासिडोनियन लोकांस ते आपणांहून अत्यंत हीन समजून त्यांची अवगणना करीत तेच साऱ्या ग्रीस देशास शिरजोर झाले. त्यानंतर अक्षरशून्य जे रोमचे दांडगे शिपाई त्यांनीं सहज तो सगळा देश सर केला, आणि त्यांच्या मागून तर वाळवंटांतून भटकणारे जे आरब त्यांची एक टोळी इकडे येऊन त्यांनीं मूर्ति फोडण्यास व सगळ्या देशाची धूळधाण करण्यास आरंभ केला. लक्ष्मीच्या चंचलतेचें व दैवाच्या आस्थिरपणाचें आणखी उदाहरण हावें असल्यास रोमचेंही आहे! या शहरच्या इतिहासापेक्षां चमत्कारास्पद दुसरें काय आहे! रॉम्युटसानें जी मर्यादा पहिल्यानें नांगरानें आंखून दिली तीच वाढतां वाढतां कोठपर्यंत वाढली! त्यावेळेस माहीत असलेलें सारें जग तींत आलें पण येवढें होऊनही शेवटीं काय राहिलें! ज्या रोमन लोकांचा मागें पाय ह्मणून कोठें कधींही आलाच नाहीं, ज्यांचें धैर्य असें अढळ कीं, केनीच्या मोठ्या लढाईत हानिबलानें त्यांचे बहुधा हातपायच मोडून टाकले असतांही जे यत्किंचित्‌ही न डगमगतां जो कोणी शत्रूस शरण जाण्याची मसलत काढील त्यास मारून टाकावें असा ज्यांनीं नियम केला, ज्या वीरांचा अद्भुत पराक्रम ऐकून ईजिप्ट, हिंदुस्थान अशा दूरदूरच्या देशांतूनही त्यांकडे वकील येत, त्यांसच शेवटीं रानटी जे गॉल, व्यांडल, गॉथ, हन्स, आरब, तुर्क अशा लोकांपुढें थरथरां कांपावें लागलें! असो, तर याप्रमाणें हें कालचक्र सतत फिरत आहे! याच्या सपाट्यांत कोणाचें काय होईल याचा काय नेम आहे? तेव्हां आमचे पूर्वज केवढेही थोर असले, व सध्यां आह्मी

कितीही नीच पदवीस आलों असलों, तरी त्यांत चमत्कार कसचा? जी गति ग्रीक व रोमन लोकांसही चुकली नाहीं तीच हिंदूंसही प्राप्त झाली असल्यास नवल कसचें? याप्रमाणें सध्यांच्या पक्षीं मनाचें समाधान करून घेण्यास सवड झाली असती; आणि आमच्या पूर्वीच्या वैभवाकडे पाहून आमचा मान चोहोंकडे अद्याप असता! पण हें तरी कोठें आहे? आमच्या देशाविषयीं व आमच्या लोकांविषयीं एकंदर जगाच्या कशा समजुती आहेत त्या येथें विशेष सांगायाला पाहिजेत असें नाहीं. मोठमोठ्या नामांकित इंग्रेज ग्रंथकारांच्या ग्रंथांत, हिंदुस्थानासंबंधीं कांहीं प्रकरण निघालें असतां पार्लमेंट सभेंत येशूख्रिस्तानें वरद हस्त डोई-वर ठेवून सर्वज्ञ केलेल्या मिशनरी लोकांच्या मोलवान् भाषणांत, त्यांच्या प्रसादानें सर्वज्ञतेची झुळूक ज्यांच्यावरून गेली अशा येशूच्या कळपांत जाऊन फसलेल्या बिचाऱ्या बाट्यांच्या दांभिक बोलण्यांत, किंवा ख्रिस्ताच्या शरीराचे रक्ताचे भोजनापुरतेच अर्धे मुर्धे मेंढे बनून कळपांत शिर-लेल्या लबाड लांडग्यांच्या कपटव्याख्यानांत, वगैरे जिकडे तिकडे एक घोष ऐकूं येतो! त्याचा सारांश हा कीं, आह्मां-सारखे मूर्ख, वेडगळ, भितरे, लबाड, दुराचारी असे आह्मीच. इंग्लंडांत अगोदर हिंदुस्थानाचें नांव निघालें कीं, लोकांच्या कपाळास तिडीक उठते; पण त्यांतूनही आमच्या देशास आपल्या वास्तव्यानें भूषित करण्यास व आह्मांवर उपकार करण्याच्या बुद्धीनें जे कोणी-कोणी इकडे येतात, ते येतांना मेकॉले साहेबाचे ‘ लॉर्ड क्लाइव्, वॉरन हेस्टिंग्स,’ हे निबंध रेल्वे स्टेशनांवर विकत घेऊन वाचीत असतील! साहेबांची वृत्ति मुळची सौम्य व ज्ञानही अगाध असतेंच! त्यांतून हे सुंदर निबंध वाचल्यावर तर हिंदुस्थानावर पा-ऊल ठेवतांच त्यांच्या मनांत अशी वृत्ति उद्भवत असतील!

'अहो! क्लाइव् व हेस्टिंग यांस इतके श्रम तरी पडले! मी असतों तर एका सपाट्यास साऱ्या हिंदूंस चीत करून दिलें असतें! मी एक शब्द बोलेन तर त्यांचे सगळे ग्रंथ त्यांस कस्पटाप्रमाणें वाटवीन!' आह्मांस खचित वाटतें की, मोठमोठ्या वरिष्ठ कामदारांपासून तों रेल्वेच्या यःकश्चित् गार्डापर्यंत जो अरेरावीपणा सर्वांत दृष्टीस पडतो तो इंग्रज लोकांच्या अंगच्या उद्दामपणामुळें व त्यांचें हिंदुस्थानावर प्रभुत्व झालें आहे यामुळेंच केवळ आलेला नव्हे. हिंदु ह्मणजे काय? कस्पटापेक्षां कस्पट, अधमांहून अधम, सर्वांपेक्षां मूर्ख असे जे वेडगळ समज साऱ्या लोकांचे झाले आहेत, जे अधिकाधिक दृढ करण्याविषयीं ज्याचा त्याचा यत्न चालू आहे, त्याचें जर आमचे लोक खंडण करतील, आणि आपली योग्यता प्रगट करतील, तर वरील दांडगेपणा बराच कमी होईल यांत संशय नाहीं. याविषयीं दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांची खात्री होईल. सर्व इतिहासज्ञांस, किंबहुना इकडील सर्व लोकांस सर मालकम् साहेबांचें नांव ठाऊक असेलच. अव्वल इंग्रजींत ज्या साहेबांचीं नांवें या प्रांतांत आबालवृद्धांस माहीत होतीं व ज्यांवर एकंदर लोकांचाही लोभ जडला असे, त्यांत अल्पिनष्टनच्या खालोखाल सदर्हु मालकम् साहेबांचें नांव होतें. या भल्या साहेबानें आपणांविषयीं हा मजकूर लिहिला आहे.

"माझी स्वतःची एतद्देशीय लोकांविषयीं पहिल्यानें काय समजूत होती ती अजून मला आठवते;—व ती आठवली असतां माझी मला मोठी शरम वाटते, ती अशी होती कीं, माझ्या हाताखालीं जे नेटिव कामगार आहेत ते माझ्यापेक्षां सर्व प्रकारें किती हलके आहेत! असें मला बरेच दिवस वाटत असे; पण जसजसें येथील लोकांविषयीं व

माझे स्वतःविषयीं मला अधिकाधिक कळूं लागलें तसतसा आमच्यामधील भेद कमी कमी होत गेला. आमचे इंग्रज लोकच आपल्या श्रेष्ठपणाचा मोठा डौल मिरवितात हें मीं पुष्कळ ठिकाणीं पाहिलें आहे व ऐकलेंही आहे. पण युरोपांतील व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रतींच्या लोकांची त्यांच्या मानानें परस्पर तुलना केली, तर तिकडच्या लोकांस गर्व मिरविण्यास मोठेंसें कारण दिसेल असें वाटत नाहीं! तसेंच सगळ्या हिंदूंविषयीं एकंदर सरसकट जें मत ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येतें. कीं ते सारे लोक येथून तेथून लुच्चे लबाड आहेत, त्यांची भल्यानें संगत करूं नये, आणि ते बुद्धीचे इतकें मंद आहेत कीं, विद्याभ्यासाच्या योगानें ज्यांचीं मनें विशाल व उदार झालीं अशा युरोपियन लोकांच्या संभाषणास व स्नेहास ते अगदीं लायख नाहींत. हेंही मला बिलकूल मान्य नाहीं."

दुसरें उदाहरण, कालब्रुकनामक प्रख्यात संस्कृतज्ञाचें. आपल्या प्राचीन विद्येचा व्यासंग करून तिची माहिती युरोपांत ज्यांनीं करून दिली, त्या पंडितांच्या मालिकेंत याची गणना मोठी आहे. असें असतां याच साहेबाचे आधींचे उद्गार येथें दाखल केले असतां सर्वांस मोठा चमत्कार वाटेल; व तो पुनः वाचून कोलब्रुक साहेबांस स्वतःही अनेक वेळां खचीत लाज वाटली असेल! ज्याची पुढें संस्कृतावर येवढी भक्ति जडली, व फारशी वगैरे भाषांशींही ज्यांनें चांगला परिचय केला, त्यानेंच विल्किन्स नामक संस्कृतज्ञांस संस्कृताचें वेड डोक्यांत शिरलेला असें ह्मणावें, एशियाटिक मिसलेनी ह्मणून एक बंगाल्यांत पुस्तक काढीत असत. त्यास 'वेडगळ' 'ऐन अकबरी' ग्रंथास 'हा नुसता उकिरडा आहे, यांत एखादें दुसरें मोतीं सांपडेल न सांपडेल' असें ह्मणावें ही केवढी चमत्काराची गोष्ट! या दो-

न उदाहरणांवरून आमच्या वाचकांस स्पष्ट दिसून येईल कीं, एकंदर जगास आमच्या देशाविषयीं यथार्थ ज्ञान बिलकूल नाहीं. तसेंच यावरून आम्हांस असेंही खचीत वाटतें कीं, जे जे युरोपियन लोक येथें येऊन पुनः माघारीं गेले व जातात, त्यांच्या हिंदूंविषयीं पहिल्या समजुतींत व शेवटल्या समजुतींत फारच तफावत पडत असेल! नाहीं अशी मेकॉलेसारख्या दुराग्रही व कोत्या मनाच्या लोकांची किंवा युरोपांतून शुभवर्तमान घेऊन येऊन तें बहुधा जसेंचें तसेंच गुंडाळून माघारें न्यावें लागल्यामुळें निराश झालेल्या मिशनरी लोकांची मात्र समजूत पालटत नसेल! मग हे सद्गृहस्थ तिकडे गेल्यावर आपलें सर्व पांडित्य हिंदूंवर खुशाल बिनधोक ओतीत असतील. तिकडे अगोदर हिंदुस्थानाविषयीं माहिती इतकी जब्बर कीं, शिंदा हिंदु कीं मुसलमान याची भ्रांत. हैदर दिल्लीस राज्य करीत होता कीं त्रावणकोरास राज्य करीत होता कोण जाणें? मुंबईस एखाद्यास पत्र लिहिलें असतां मद्रासेस व कलकत्त्यास असणाऱ्या इष्टमित्रांचा समाचार त्यांत पुसायचा! केवळ नकाशाकडे पाहून किंवा इतिहासाच्या चार ओळी वाचून जी माहिती मिळायाची तिची इतकी भ्रांत; मग अशा लोकांस हिंदु धर्माची, हिंदूंच्या विद्येची, त्यांच्या भाषांची वगैरे माहिती कितपत असेल हें सांगावयास नकोच! फार कशाला अजूनही हा प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडत नाहीं काय? संस्कृतामध्यें ओ का ठो करतां येत नसतांही हिंदुधर्माविषयीं सव्वा सव्वा हात गप्पा झोंकणारें पाद्री साहेब कोणी पाहिले नाहींत? 'पंचतंत्र या महाग्रंथाचें अकटोविकट अध्ययन करून खासे पी. एच. डी. बनून आलेले चारी वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें यांत पारंगत झालेले श्वेतद्वीपीय व शार्मण्यदेशीय शास्त्री कोणास माहीत

नाहींत? पण अं:! यांत काय आहे? संस्कृतचसें काय, एशिया खंडांतील झाडून साऱ्या भाषांत ज्यांचा कोणी हात धरणारा नाहीं असें पूर्वदेशीय भाषांचा बाणा बाळगणारेही युरोपांत तयार होऊन इकडे येत नाहींत काय? त्यांस तुह्मी आरबी विचारा, फारशी विचारा, चिनी विचारा; सगळ्यांत तयारी! प्रश्न करण्याचा अवकाश! साहेबांची बुद्धि येथवर फांकली असल्यावर मग युनिव्हार्सिटींत मराठीचीं बुकें नेमतांना 'विद्येपासून लाभ आणि संतोष,' 'ईश्वरी ज्ञान' वगैरे लाखों ग्रंथ त्यांनीं निवडल्यास किंवा दक्षिणाप्राईजकमिटीकडे कसाही गद्यपद्यात्मक ग्रंथ येवो त्यावर काड्कन् न्यायाच्या तराजूंत जोखलेलें मत साहेबांनीं दिल्यास आश्चर्य कोणतें? वा:! एकून अक्कल हा जिन्नस हल्लींच्या काळीं युरोपखंडांत जितका रगड पिकतो तितका एकोणिसाव्या शतकाच्यापूर्वी कधीं कोठेंही पिकला नसेल!! हा देवानें आपल्या आवडत्या लोकांवर एकदम महाप्रसाद केला असेल, किंवा त्याच्या पुत्रानें आपलें शुभवर्तमान भूमंडळावर फैलावलेंसें पाहून खुष होऊन आकाशांतून हें अपूर्व पारितोषिक पाठवून दिलें असेल कोण जाणें! असो; तेव्हां सांगायाचें काय कीं, असे अरण्यपंडित इंग्लंडांत गेल्यावर 'एरंडोऽपिद्रुमायते' या न्यायानें तेथें मोठी प्रतिष्ठा व विद्वत्तेबद्दल मान पावतात. मग काय सांगतील ती पूर्व दिशा! कोणत्याही लोकांस इतरांचा मोठेपणा व थोरवीचें वर्णन कधीं सहन होत नसतेंच; त्यांतून हिंदूसारखे लोक; जे त्यांच्या सत्तेखालीं आलेले त्यांचें वर्णन काय करावयाचें आहे? यास्तव लोकांस हसवावयासाठीं व आपण किती थोर आहों हें त्यांस समजविण्यासाठीं हिंदूंचा जितका पाडाव करावा तितका इष्टच! त्यांतून दुसरें काय झालें आहे कीं, हिंदूंचा फार प्राचीन काळापासून सं०

पत्तीविषयीं, कलांविषयीं, विद्येविषयीं वगैरें मोठा लौकिक; इतका कीं, युरोपांतील सर्व राष्ट्रें तिकडून आलेले अमोलिक जिन्नस पाहून हिंदुस्थानाविषयीं केवळ वेडे होऊन गेले होते. कोलंबस अमेरिकेजवळील बेटांत जाऊन लागला. पण त्यास आपण हिंदुस्थानच शोधून काढला असें वाटून त्यानें त्यांस तेंच नांव दिलें तें अद्याप चालत आहे; तसेंच ग्रीक व रोमन लोकांतही आमच्या पूर्वजांची मोठी ख्याति होती असें त्यांच्या ग्रंथांवरून वगैरे दिसतें. तेव्हां येवढ्या नामांकित लोकांचें नाक खालीं करून ते अत्यंत नीच आहेत हें दाखविलें ह्मणजे इंग्रज लोक मोठे थोर कसे नाहीं झाले ? अर्थातच झाले. खिस्ती धर्माकरितां वेडे होऊन गेलेल्या मिशनरी लोकांनीं हिंदूंविषयीं एकंदरींत, व विशेषतः धर्मासंबंधानें, हवी तितकी बडबड केली तरी ती त्यांच्या पोरपणास व येशूच्या नांवास शोभते खरी; पण सत्याचा, न्यायाचा व विद्वत्तेचा बाणा बाळगणाऱ्या अशा मोठमोठ्या ग्रंथकारांनींही आमच्या देशाविषयीं झोटिंगपाच्छाहीचा मजकूर लिहावा हा केवढा चमत्कार आहे? मेकॉले साहेब मोठ्या तीव्र बुद्धीचा, बहुश्रुतपणाचा, रसिकतेचा व निःपक्षपातपणाचा बाणा मारीत असतां हिंदुस्थानाच्या संबंधानें जेथें जेथें कांहीं ह्मणून लिहिलें आहे तेथें तेथें अत्यंत दुराग्रह किंबहुना पोरकटपणाही त्यांनीं प्रकट केला आहे. त्यांची माहिती केवढी जब्बर होती हें त्यांस दहा बारा भाषा येत होत्या यावरून व त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट दिसतेंच. दृष्टांत देण्याविषयीं तर त्यांची हद्दच होती. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांतून अर्वाचीन युरोपांतील भाषांतल्या ग्रंथांतून किंबहुना फारशी वगैरे इकडील ग्रंथांतून हावे ते त्यांनीं प्रसंगवशात् दिले आहेत. पण नाहीं ,असा संस्कृतांतून!

त्यांच्या तडाक्यांतून आमच्या कालिदासाचें 'शाकुंतल' नाटक कीं ज्याचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध होतांच स्लेजेल, हंबोल्ड्, गेटी अशा महापंडितांस त्यानें गर्कच करून टाकलें. तें चुकलें असेल असें मुळींच संभवत नाहीं. त्यांतून साहेबमजकूर आमच्या देशांत तीन चार वर्षें येऊन राहिलेही होते. पण कांहीं नाहीं. फारशी ग्रंथाचा संबंध जसा त्यांनीं आपली माहिती दाखविण्याकरितां आपल्या ग्रंथांत कोठें कोठें आणला आहे, व फर्दोशी, शेक सादी वगैरे कवींचीं नांवें मोठ्या प्रेमानें आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं आणलीं आहेत, तशीं हिंदु कवींचीं मात्र विलकुल कोठें नाहींत. आह्मांस खचीत वाटतें कीं, त्यांनीं 'शाकुंतला'चें भाषांतर जें एखादे वेळेस कधीं वाचलें असेल! तें त्यांचे बंधु जेम्स मिल इतिहासकार त्यांच्या सारखें घूक दृष्टीनेंच वाचलें असेल! बरें, ते इतके दिवस बंगाल्यांत राहिले तेव्हां नंदकुमाराच्या देशबांधवांची वर्तणूक त्यांनीं 'वॉरन हेस्टिंग्स्' या निबंधांत लिहिली आहे तशीच त्यांच्या नजरेस आली असेल काय? ह्मणजे लहानापासून थोरापर्यंत सर्वच लबाड, ठक, मूर्ख असे त्यांस आढळले असतील काय? तसेंच जेवढा टापू त्यांनीं पाहिला असेल तेवढ्यांत कोणत्याही संबंधानें चांगलें ह्मणण्यासारखें त्यांत कांहींच दिसलें नसेल? काय असेल तें असो. गरीब बिचारा हिंदुस्थान! त्याच्या धर्माची तर सर्वांनीं पायमल्ली करावीच—'टुमी हिंडू लोक' करणाऱ्या पाद्री साहेबापासून तों मोठ्या लाट साहेबांपर्यंत—त्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथकारानेंही एके ठिकाणीं आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें त्यावर वर्षाव केलाच आहे, त्याचा अंमळशानें उल्लेख करूं. पण नवल पहा काय कीं; आमच्या देशाची संपत्तिही साहेब मजकुरांस सहन झाली नाहीं!! त्यांनीं वर सांगितलेल्या

सर्व प्रसिद्ध निबंधांत असा मजकूर लिहिला आहेः-- "मोठ्या शाहण्या व्यापाऱ्यासही हिंदुस्थानांतील संपत्तीचा मोठा बाऊ असे. त्यांच्या मनांत अशा वेड्या कल्पना घोळत कीं, हिंदुस्थानांत हिऱ्यांचीं जोतीं, रत्नांचे खांब सोन्याचे वाडे असे आहेत. पण खरोखरी पाहतां हा सगळा भ्रम होता. युरोपांत पोर्टुगाल देश, किंवा त्याहूनही ऐर्लंड देश, भिकारी समजतात; पण हिंदुस्थान तर ऐर्लंडाहूनही भिकारी आहे ! ! !" लॉर्डसाहेबाचें हें महावचन ऐकून आमचे वाचक खरोखर भांबावून जातील !--काय ! हिंदुस्थान आणि भिकारी !--वाः ! दिवसा ढवळ्या साऱ्या जगाच्या डोळ्यांत माती टाकण्याचें हें साहेबांचें धाडस त्यांचें त्यांसच शोभो ! हिंदुस्थान जर दरिद्री झाला तर मेकॉले साहेबांचा देश कशानें श्रीमंत झाला कोण जाणे ! शिशाच्या व कोळशांच्या खाणींनीं तर नाहींना ! कोणीं नाहीं ह्मणावें ? उद्यां मेकॉले साहेबांचे एखादे बंधु साऱ्या जगास कदाचित् जाहीर करतील, कीं 'अहो हिमालयाविषयीं मोठ्या भूगोलवेत्त्यासही मोठी भ्रांति आहे. आमच्या इंग्लंडांतलें एखादें लहानसें टेपाड त्यास उंचींत हटवून टाकील ! तसेंच गंगा ब्रह्मपुत्रा यांची सारे लोक रिकामी बढाई सांगतात. आमच्या लंडनांतलें एखादें गटार पुढें होईल तर त्यांस मागें सारून देईल !' जुलमी राजांनीं प्रजा चरकांतून पिळून काढल्यामुळें येथील लोकांस अगदीं त्राण उरलें नसतें असें जर आमच्या साहेबाचें ह्मणणें असेल, तरी वरील वाक्य क्लैव हेस्टिंग्स अशांच्या देशबंधूस फारच नामी शोभतें ह्मणायाचें ! असो ? या वरील मतावर आणखी विस्तार येथें करीत नाहीं. तें आमच्या वाचकांवरच आह्मी सोंपवून देतों. आतां वरील महाविद्वान् साहेबांचें आ---- ि---- धर्मावरील मत ऐका. सरकारानें प्रजेवर धर्माच्या बाबतात सक्ती करावी कीं नाहीं

असा विषय चालला असतां तदनुरोधानें मेकाले साहेब हिंदुस्थानाविषयीं लिहितात:--"परधर्म जबरीनें लोकांवर बसविला असतां जेथें त्यांचें अपरिमित कल्याण होईल असा देश हिंदुस्थानाखेरीज कदाचित् दुसरा कोठेंही सांपडणार नाहीं. तेथील धर्मासारखा नीचतेस पोंचलेला धर्म साऱ्या पृथ्वीवर कोठेंही नाहीं. त्याचा समूल उच्छेद करून खिस्ती धर्माचें अत्यंत दीन जें स्वरूप कधीं कोठें चालू असेल तें त्याच्या जागीं आणून बसविलें असतांही त्या देशांतील लोकांचें अतोनात हित होणार आहे! 'वा:! येथें तर आमच्या साहेबांनीं आपल्या सर्वज्ञतेची पराकाष्ठाच दाखविली. आमच्या देशाकरितां राज्यसंबंधाचे कायदे करण्याच्या कामांत हे साहेब पुढारी होते, व सध्यां चोहोंकडे चालू असणारी शिक्षणपद्धतीही त्यांनींच घालून दिली, या डौलावर जाऊन आमच्या धर्मावरही ते घसरले नसतीलना! वरील त्यांच्या लेखावरून पाहतां हे साहेब येशूचे पुरे भक्त असून आमच्या धर्मातला त्यांस खडान् खडा माहीत होता, याविषयीं आह्मांस संशयच उरला नाहीं! साहेबांचें लिहिणें कोठेंही पहा; तें अर्धबोबड्या मनुष्यासारखें अर्धेमुर्धें कधीं नसायचेंच. त्यांतून हिंदुस्थानासारख्या देशाविषयीं लिहितांना तर तें अगदीं निक्षूनच असायचें. त्यांची व त्यांच्या देशबंधूंची खात्रीच होऊन गेली आहे, कीं आमच्या देशाविषयीं कितीही वाईट लिहिलें तरीं तें पुरें नाहींच होत! मग कशाला कसर करा! मानवी भाषेनें जेथवर ह्मणून निंदा व्यक्त करतां येते तेथवर तिचें सत्व बघून बिचाऱ्या हिंदुस्थानावर वर्षाव! ही मजा ज्यांस पुरतेपणीं पहावयाची असेल त्यांनीं जेम्स मिल्ल साहेबांचा 'हिंदुस्थानचा इतिहास' पहावा. यांनीं तर इतिहास लिहिण्याची नवीच तऱ्हा जगांत प्रगट केली. इतिहासकार इंग्लंडांत; ज्याचा इतिहास लिहावयाचा

तो देश सात आठ हजार कोस दूर; तेथील लोक काळे कां गोरे कधीं पाहिले नाहींत; तेथील भाषांच्या ज्ञानाच्या नांवानें तर आंवळ्यायेवढेंच ह्मणण्यास हरकत नाहीं. अशा थाटानें हे साहेब इतिहास रचावयास बसले. बरें इतकेंही नाहीं म्हटलें; येथील देशाची हकीकत ज्यांनीं लिहिली त्यांच्या लेखावरच निर्वाह करून इतिहासकारानें आपलें बुद्धिकौशल्य योजून निदान नि:पक्षपातानें खरा मजकूर तरी लिहिला असेल ह्मणावें पण तसें तर बिलकूल नाहीं. स्वत: हिंदुस्थानाविषयीं माहिती तर मेकॉले साहेबांच्याच तोंडीची; तेव्हां दुसऱ्यांचे लेख तर पाहायाला हवेच. पण खुबी काय करावयाची? जेवढें ह्मणून हिंदूंच्या विरुद्ध लिहिलेलें सांपडेल तितकें मात्र घ्यावयाचें; पण त्याच ग्रंथकारानें त्याविषयीं जेवढा प्रशंसेचा मजकूर लिहिला असेल तेवढाच नेमका गाळावयाचा! येवढी सगळी सामुग्री असल्यावर मग हा इतिहास किती उत्कृष्ट उतरला असेल हें सांगावयास नकोच. या थोर इंग्रज इतिहासकारांच्या मनांत आमच्या हिंदुस्थानाविषयीं केवढी बळकट अढी होती ती थोडक्या उदाहरणांवरून वाचकांस कळवितों. सारें जग ज्यांस पाहून विस्मय पावतें अशा डाक्याच्या मलमली, अग्र्याचा ताजमहाल, कालिदासाचें 'शांकुतल नाटक' वेरूळाचीं लेणीं हीं सुद्धां साहेबांच्या पसंतीस उतरलीं नाहींत!! लेण्यांविषयीं त्यांनीं एक तर्क सुचविला आहे तो मोठ्या मौजेचा आहे. साहेबांची कल्पना अशी धांवते कीं, हीं लेणीं कदाचित् भूईतूनच स्वयंभू वर निघालीं असतील किंवा आकाशांतील ढगांतून खालीं कोसळलीं असतील!!! विलायती कल्पना खरी! असो; तेव्हां असे दिव्य इतिहास एकंदर जग आमच्याविषयीं कल्पना बांधणार! मग त्यांत आमच्याविषयीं त्या

आतांप्रमाणें अत्यंत मूर्खत्वाच्या असल्यास नवल काय?

२. पण वरच्याहूनही विशेष मूर्खपणाचा व लज्जेचा प्रकार अजून सांगणें आहे. तो कोणता तर खुद्द आपल्याच देशांतला. हिंदुस्थानाशीं एवढा निकट संबंध झाला असतांही इंग्रजांस व तद्द्वारेंच काय तें इतरांस ज्ञान होणार; यास्तव बाकीच्या एकंदर जगास त्याविषयीं यथार्थ ज्ञान बिलकूल नाहीं, यांत वास्तविक पाहतां मोठेंसें आश्चर्य नाहीं. कारण आह्मांत व इंग्रजांत हरएक गोष्टींत मनस्वी अंतर आहे. इंग्रज तरवारीच्या जोरानें अरेराव झालेले; आम्ही हतवीर्य होऊन त्यांचे बंदे बनलों; आम्ही मूर्तिपूजक व ते मूर्तिभंजक; आह्मी फार झालें तर बायकांस बरोबरीनें वागविणारे, त्यांच्यांत तर मडमसाहेब ह्मणजे प्रतिदैवत; आह्मांस तर कीडमुंगीच्या हत्येनेंही आंगावर शहारे येणार, व प्राणांत ओढवला तरी मद्यास शिवणें नाहीं; त्यांच्यांत तर दोहोंसही मनाई नाहीं. हें तर काय पण दोन्ही पदार्थ अनुक्रमेंकरून त्यांच्या पैगंबराचें शरीर व रक्त मानलें असून स्वर्गारोहणाची पहिली पायरीच होत; आमच्या स्त्रियांस परपुरुषाचें वारें सुद्धां पातिव्रत्यभंजक; त्यांच्यांत हें तर काय पण मोठ्या शृंगारवेषानें परक्याबरोबर नृत्य करणें हें अत्यंत प्रतिष्ठादायक! याप्रमाणें हजारों गोष्टींत आह्मांत व इंग्रजांत रात्रंदिसाचें अंतर असतां इंग्रजांनीं आपल्या अत्युच्च पदापासून खालीं येऊन हिंदूंशीं स्नेह करावा व त्यांविषयीं यथार्थ ज्ञान संपादन व्हावें कसें? हें ज्ञान त्यांस क्रमाक्रमानें होत जाईल खरें; पण मिल, मेकॉले हे पुरते लबाड ठरण्यास आणखीं शंभर दीडशें वर्षें तरी हवींत असें आह्मांस वाटतें! तेव्हां मुसलमानांचा व आमचा जितपत हल्लीं स्नेहभाव झालेला दृष्टीस पडतो तितका कदाचित् आमचा व इंग्रजांचा हो-

ईल. पण तेथपर्यंत वर लिहिल्यासारखीं मतें मोठे ज्ञाते ह्मणविणाऱ्या साहेबांच्याही मनांतून निघावयाचीं नाहींत, तर त्याप्रमाणें परदेशस्थ लोकांच्या समजुती आमच्याविषयीं किती व ईट असल्या व कशाही हेकटपणाच्या असल्या तरी त्यांस सवड आहे. पण तशाच किंबहुना त्यांहूनही वेडगळ, अशा जर आपणच आपणांविषयीं वागवूं लागलों, तर मग केवढ्या आश्चर्याची गोष्ट? आमची पुष्कळ दिवसांपासून पक्की खात्री होऊन गेली आहे कीं, इंग्रजलोकांच्या अज्ञानानें व दुराग्रहानें, खिस्ती भटांच्या मतलबी व हेकटपणाच्या उपदेशानें, त्यांच्या पुढें पुढें करणाऱ्या बाटयांच्या व लबाड शिष्यांच्या मूर्ख व्याख्यानांनीं सुशिक्षित ह्मणविणाऱ्या अर्धवोबड्या लोकांच्या पोकळ शब्दपांडित्यानें, एकंदर देशांत स्वतःविषयींच्या दुर्मतांचें जें महाजाल चोहोंकडे पसरलें आहे तें पार नाहींसें करून लोकांचीं मनें साफ दुरुस्त करणें ह्मणजे ग्रीक लोकांच्या हर्क्युलीसानें ऑजियस् राजाच्या तबेल्यांत फार दिवस बिऱ्हाड करून राहिलेली लीद व घाण दोन नद्या धरून आंत सोडून जशी पार धुवून टाकली, तसेंच एखाद्या अचाट महावीरानें उठून येथें केल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं! ज्या गोष्टी धडधडीत डोळ्यांपुढें जणों काय प्रत्यक्ष दिसणाऱ्या आहेत त्यासुद्धां नाहींशा ह्मणून वरील लबाड व मूर्ख लोकांनीं पंचतंत्रांतील तीन धूर्तांच्या गोष्टीप्रमाणें आमच्या डोळ्यांत माती फेंकली आहे! धूर्तांनीं त्या भोळ्या ब्राह्मणास फसवून प्रत्यक्ष पशूवर जशी कुत्र्यांची भ्रांति करविली, त्याप्रमाणें आमचे पूर्वज सर्व राष्ट्रांत अग्रगण्य असतां व साऱ्या जगाचे गुरु असतां त्यांच्या पदरीं या कुत्सित लोकांनीं वेडगळपणा व मूर्खपणा बांधला आहे. बरें हेंही असो; पण प्रत्यक्ष आमच्या पदरीं हल्लींही ते मंदता, क्रूरता, भीरुत्व इत्यादि

 २७१५

दोष लावूं पहात आहेत, तेव्हां त्यांच्या धाडसास काय ह्मणावें ? युनिव्हर्सिटी स्थापन होऊन नुकतीं पंधरा सोळा वर्षें होताहेत, तोंच ज्या लोकांत किताबी विद्वान् पैशापासरी या मोलानें विकूं लागले, ज्यांनीं खुद्द विलायतेंतही बुद्धिमान् ह्मणून नाक मिरविणाऱ्या लोकांचा पाहिल्याच सपाट्यास त्यांच्याच भाषेंत नक्षा उतरविला, त्यांच्याच न्यूटनसारख्या महापंडिताच्या ग्रंथावरही कोटि चालविणारे आढळतात, तेच लोक 'बुद्धिमंद असून विद्वान युरोपियनांच्या संभाषणास व स्नेहास लायक नाहींत ! ! ज्यांच्यांत प्रत्यहीं लक्षावधि निरपराध प्राण्यांचा वध होत आहे, ज्यांच्यांत मद्याचा तर कधीं कोणीच निषेध केला नसून ज्यांची मगरुरी इतकी कीं, केवळ बोलतां बोलतां ज्यांनीं हातघाईस यावें, उन्मत्त पशूप्रमाणें मोठे विद्वान् ह्मणविणारांनींही द्वंद्वयुद्धें करावीं, ज्यांची सुधारलेली करमणूक ह्मटली तर ' पिजन शूटिंग ' ह्मणजे खबुतरांच्या करंड्याचें झांकण उघडें करून तीं बिचारीं पांखरें वर उडूं लागलीं असतां त्यांच्या नाजूक अंगांत छरे रोंवायचे अशा प्रकारची, धर्माच्या कलहांत ज्यांनीं लक्षावधी लोकांचे प्राण घेतले, ज्यांच्या पवित्र शास्त्रानें अंगांत इतकी दया संचरते कीं, सगळें खंडचें खंड जी उजाड करण्यास प्रवृत्त करून मूर्तिपूजक काळ्या निग्रो लोकांवर धाड घालून जनावराप्रमाणें त्यांचा राजरोस विक्रय केला असतांही जीस बाध येत नाहीं, ताडावर चढणाऱ्या काळ्या माणसांचीं ज्यांच्या अपूर्व ज्ञानदृष्टीनें माकडें बनून जे त्यांवर छऱ्यांची सहज लीलेनें कृपा करितात, अशी अत्यंत सुशील, अत्यंत दयाळु, अत्यंत धार्मिक, 'एका गालावर मारली तर दुसरा गाल पुढें करणाऱ्या ' देवाच्या आवडत्या पवित्र लोकांपुढें आमच्या बिचाऱ्या हतभाग्य हिंदूंचा काय पाड ! ! तसेंच आह्मी भेकड खरेच, वसईच्या किल्यावर भगवा झेंडा रोंव-

तांना भेदारलेल्या एखाद्या पेढूला किंवा सुमारें शंभर वर्षांपूर्वी वडगांव मुक्कामीं दांतीं तृण धरावयास लावलेल्या एखाद्या टोपीवाल्यास विचारलें असतें तर तो आमच्या भेकडपणाचें फार शान वर्णन करता ! ! फार लांब नको; नाना क्षणतांच + + वर कांटा उभा राहिलेले अजूनही शूर साहेब शेंकडों सांपडतील ! असो; तेव्हां अशा धडधडीत सर्वदेखतां झालेल्या व होणाऱ्या गोष्टीही ज्या दुरभिमानांध लोकांस दिसत नाहींत त्यांस काय ह्मणावें ? ही तर दुराग्रहाची व मूर्खत्वाची पराकाष्ठाच; पण जे आमचे लोक अशा फू करतां उडून जाणाऱ्या पोकळ शब्दपांडित्यानेंही फशताल त्यांची तर केवढी बहादुरी ! आमच्या लोकांत सध्यां जर स्वतःविषयीं सनजुतीं पाहिल्या तर कशा आहेत: अहो ! 'आह्मी कसचे लोक हो ! आह्मी का शूर विद्वान् आहों, कां सदाचारी आहों, कां सद्धर्मी आहों ? आमचे पूर्वज तरी कसले ! त्यांनीं ग्रीक व रोमन लोकांप्रमाणें राज्यें काबीज केलीं, कां हल्लींच्या इंग्रजांप्रमाणें आगगाड्या काढल्या, तारायंत्रें रोंवलीं, कां कलाकौशल्य वाढवलें ? काय केलें ? आमचा धर्म काय, आमचीं शास्त्रें काय, आमचें ज्ञान काय सगळें येथून तेथून वेडगळपणाचें. या सर्वांचा जेव्हां समूळ उच्छेद होईल तेव्हां कोठें हिंदुस्थानास कांहीं सुधारणुकेची कळा येऊं लागेल.' पाद्री भटांनीं, मेकॉलेसारख्या लहान तोंडीं मोठा घास घेणाऱ्या अप्रयोजक ग्रंथाकारांनीं स्वभाषा वेडगुजरी बोलूं लागण्यापुरतें किंवा गिचमिड फर्डेशाई सही करण्यापुरतेंच इंग्रजीचें चुटपुटतें ज्ञान मिळवून तेवढ्यावरच मोठ्या पांडित्याचा आव घालणाऱ्या आमच्या अलीकडच्या नव्या विद्वानांच्या कोत्या समजुतींनीं वगैरे जीं वरच्यासारखीं कुत्सित मतें चोहोंकडे माजविलीं आहेत त्यांचें पूर्ण खंडन केल्यास एक स्वतंत्र ग्रंथच बनेल. पण

तसें करणें प्रस्तुत स्थलीं इष्ट नसून तें कोणत्याही सामान्य समजुतीच्या मनुष्यास मोठेंसें कठीण पडेल असेंही वाटत नाहीं. यास्तव त्या संबंधानें येथें कांहीं विशेष लिहीत नाहीं. आमच्या लोकांस इतकेंच सुचवितों कीं; केवळ स्वार्थसाधू मिशनरी लोकांच्या किंवा अजाणत्या हठवादी इंग्रेज ग्रंथकारांच्या ह्मणण्यावरून आपली पारख करून घेणें हें अप्रयोजकपणाचें व आपणांस अत्यंत लज्जास्पद असें कृत्य आहे. वरील साहसी लोकांचें अज्ञान व दुराग्रह त्यांच्या पदरांत घालून त्यांस चीप न बसवतां जर त्यांच्या अद्वातद्वा बडबडीस आपण उलटी मानच डोलवीत गेलों तर मग आपण जसे शरीरानें परकी लोकांचे गुलाम झालों आहों तसेंच मनानेंही [illegible] आपल्या हातीं इंग्रेज हे दुसरें मोठें स्वातंत्र्य जें आपणांस उदारपणें देताहेत त्यासही आपण पात्र नाहीं असें होईल. आपले दोष आपणांस जितके कळतील तितके चांगलेच, व ते जो कोणी आपणांस दाखवील तो आपला मोठा दावेदारी असला तरी सुद्धां मनःपूर्वक आभार मानण्यासच तो योग्य होय, हें आम्हीं पकें जाणतों; पण जो दुष्ट आमच्या सर्व गुणांसही दोषांचें रूप देऊन व दोषांचें अत्युक्तीनें वर्णन करून आम्हीं राक्षसतुल्य किंवा पशुतुल्य आहों असें जगास भासवूं पाहील त्याचे चांगले दांतच पाडणें आपणांस उचित आहे. पण तसें करण्याचें टाकून देऊन आपल्या स्वदेशाच्या निंदेंतच जर आपणांस पुरुषार्थ वाटूं लागला, व त्या मूर्खाचे आपण उलटे साह्यकारी झालों, तर मग आपल्या सत्यनिष्ठेची व शहाणपणाची पराकष्ठाच झाली असें म्हटलें पाहिजे. आमच्या विद्येविषयीं, आमच्या धर्माविषयीं, आमच्या इतिहासाविषयीं जर यथार्थज्ञान कोणास व्हावें असेल, तर तें त्यानें मेकॉलेपासूनच घ्यावें. यांचें इकडील भाषांचें

ज्ञान येवढें अगाध होतें कीं, Ali-Nagar or Port of God असें आपल्या सर्वज्ञतेच्या घमेंडींत अप्रयोजक भाषांतर करून ज्यांनीं आपलें अज्ञान व धाडस साऱ्या जगास विदित मात्र केलें,—किंवा मुंबईच्या डॉक्टर विलसनसारख्या हिंदू धर्माचें, मुसलमानी धर्माचें, पारशी धर्माचें एका सपाट्यासरसें एकदम खंडन करून देणाऱ्या अपूर्व विद्वान् मिशनरीपासून, किंवा मॉरिससारख्या छोटेखानी इतिहासकारापासून तें करून घेणें ह्मणजे आमच्या परसांत भाजी कोणती आहे किंवा तळघरांत भांडीं कोणतीं आहेत तीं समजून घेण्यास इंग्लंडांतल्या किंवा अमेरिकेंतल्या एखाद्या मोठ्या प्रसिद्ध भूगोलवेत्याकडे जाण्यासारखें हास्यास्पद होय! ज्या इंग्लिश लोकांचा एवढा बाणा आहे कीं, त्यांच्या भाषेचा नुसता उच्चारही एका इंग्रजांशिवाय दुसऱ्या कोणास—प्रत्यक्ष स्कॉटलंडांतल्या त्यांच्यांत हरहमेश वागलेल्या मनुष्यासही—साध्य नाहीं. त्यांसच येवढेंही कळत नाहीं कीं, हजारों कोशांवरून दूर आह्मी हिंदूंच्या भाषांविषयीं, विद्येविषयीं, धर्माविषयीं, किंवा अत्यंत हृद्गत गोष्टीविषयींही बेधडक हवा तसा मजकूर लिहितों हें काय, हा केवढा चमत्कार आहे ! आणि अशा पोरकळ बडबडीसही जे आह्मी महाप्रसाद ह्मणून झेलतों त्या आमच्या शहाणपणाची तर किती तारीफ करावी!

३. गेलीं पंचवीस तीस वर्षें वरील लोकांनीं, विशेषतः मिशनरींनीं, बरेंच राज्य भोगलें. त्यांनीं ह्मणावी ती पूर्व दिशा होऊन त्यांच्या पोरकट गोष्टींनीं भरलेल्या पवित्र शुभवर्तमानाची बरीच चोहोंकडे भरभर झाली. येशु ख्रिस्ताच्या कळपांत जरी महार, मांग वगैरे हीन जातींतले लोकच काय ते शारीरभुकेनेंच केवळ प्रेरित होत्साते शिरले, तरी एकंदर सुशिक्षित ह्मणविलेल्या लोकांच्या मनांत ख्रिस्ती

धर्माविषयीं बराच अभाव होता. त्या धर्माविषयीं व तो आचरणाऱ्या सुधारलेल्या इंग्रेज लोकांविषयीं त्यांच्या ठायीं एकंदरींत मोठी आदराची बुद्धि वागत असे. इंग्रजी ह्मटले कीं, त्यांत सर्व गुणांचा समावेश झाला. त्यांस इकडील सर्व गोष्टींची मोठी लाज वाटूं लागली. इंग्रजीशिवाय तर पाणीही प्यावयाचें नाहीं, तितकें अनुकूल नसलें तर निदान मधून तरी इंग्रजी शब्द बोलण्यांत जितके आणवतील तितके आणावयाचे, निदानपक्षीं 'व्यारी', 'घोरा 'गारब' अशी तरी इंग्रजीची उगीच झाक दाखवावयाची; मराठी विसरून गेल्यांत मोठी प्रतिष्ठा; गाडींत बसलें असतां कोचमिलास स्वतःच्या पदवीस चढवून जातीनें सारथ्य, पाटलून, बूट वगैरे मिरविण्यांत कांहीं विलक्षण थोरपणा किंबहुना याहूनही निंदास्पद व लज्जास्पद दुसरे विलायतेकडून इकडे आलेले ढंग करण्यांत मोठें भूषण! इत्यादि प्रकार त्या वेळेस चालू असत. ते अजूनही अगदीं मोडले नाहींतच! पण ते आतां अंमळ जुने झाल्यामुळें व एकंदर लोकांत ज्ञान व समजूत हींहि अंमळ जास्त वाढल्यानें त्यांचें प्राबल्य आतां पहिल्यासारखें नाहीं. सुमारें आठ दहा वर्षांमागेंच इंग्रजी या नांवाला जितका मान होता तितका आतां नाहीं- त्या वेळच्या पत्रांतून, पुस्तकांतून त्या वेळची स्थिति स्पष्ट दिसते. माजी मोरोबा कानोबा, स्मालकाज कोर्टाचे जज्ज, यांनीं सुमारें दहा अकरा वर्षांपूर्वीं घाशीराम कोतवाल या नांवाची एक कादंबरी रचली होती. ते वर सांगितलेल्या पुस्तकांचाच एक मासला होता- हिचा सध्यां विशेष प्रचार नाहीं, तरी एवढ्या मोठ्या हुद्देदारानें ती केली असल्यावरून तिचें नांव अजून पुष्कळांस माहीत असेल. हींत हिंदूंस, व विशेषतः महाराष्ट्राकडील लोकांस, रानटी, मूर्ख वेडगळ असें दाखविण्याचा ग्रंथकाराचा उद्देश होता!

व ब्राह्मणपणा काय तो इंग्रजांत! फार तर काय पण जे मुसलमान अजूनही अक्षरशून्य, मंद असे सर्वत्र प्रसिद्ध आहेत त्यांचें सुद्धां ज्ञान आपल्या लोकांपेक्षां विशेष दाखविलें आहे. ह्या कादंबरीवर ( सदरील ग्रंथास एवढें नांव तरी केवळ मुरवतीस्तवच द्यावयाचें! ) शालापत्रकांत आमच्या एका कॉलेजकर मित्रानें फार नामी चरचरीत अशी एक टीका केली आहे. ती सर्व रसिक व देशाभिमानी अशा आमच्या वाचकांस लक्षपूर्वक वाचण्यास आह्मी शिफारस करतों. असो. अशाच प्रकारचें पण अंमळ निराळ्या तऱ्हेचें, असें दुसरेंही एक पुस्तक साहा सात वर्षांमागें प्रसिद्ध झालें आहे. तें पुण्याचें वर्णन होय. हें पुस्तक पुष्कळांनीं वाचलें असेल. पण लिहिण्यास फार खेद वाटतो कीं या महा विद्वान् व अत्यंत थोर ग्रंथकारांची जशी शोभा करणें हवी होती तशी कोणीं केली नाहीं! यांची विशेष माहिती आह्मांस निलकूल नाहीं, पण त्यांच्या प्रस्तुतच्या ग्रंथावरून हे मिशनरी लोकांच्या हाताखालीं शिकले असून त्यांचा उपदेश पूर्ण मनांत बिंबलेल्या शिष्यवर्गांपैकीं आहेत हें स्पष्ट दिसतें. असें गुरुमुख असल्याखेरीज बैबलचा बुरूज सहा दिवस सतत खपून देवानें पृथ्वी घडली व सातव्या दिवशीं दमून विश्रांति घेतली! आमच्या आईबापांच्या तऱ्हेवाईक अपराधाबद्दल आह्मांस भलत्याच ठिकाणीं भयंकर दंड! नोहाच्या एका पोरानें आफ्रिकाखंड, दुसऱ्यानें यूरोप, तिसऱ्यानें एशिया, अशीं तिन्हीं खंडें तिघांनीं वसविलीं. ( अमेरिकेंतील व पासिफिक महासागरांतील बेटांची काय वाट झाली असेल ती असो! ) पवित्र शास्त्रांतील देव सहाव्या दिवसाच्या शेवटीं खोरें कुदळ ठेवून जो निजला तो सार्वजनिक पुनरुत्थानाच्या दिवशीं पुनः उठणार, तोंवर सगळे पापपुण्याचे खटले तसेच तुंबवून ठेवून त्या एका दिवशीं

फडाफड कोट्यानकोटी मनुष्यांचा निवाडा आपण व आपला प्रियपुत्र असे बापलेंक मिळून करणार! तेव्हां देवाचे लाडके ख्रिस्ती लोक भराभर आपापलीं थडगीं फोडून आयतेच बाहेर निघतील. ( पण हिंदूसारखे दहन पावलेले, पारशांसारखे गिधाड, घारी यांच्या पोटांत राहिलेले, तसेच समुद्रांत बुडालेले, वाघांनीं वगैरे खाल्लेल्या लोकांची त्या वेळेस आकाशांतला बाप काय तडजोड काढील ती काढो! ) इत्यादि खऱ्या धर्माचीं रहस्यें पुरतेपणीं कळून आमच्या ग्रंथकर्त्यांच्या हृदयांत एरवीं एवढा प्रकाश कसा फांकता? सद्धर्माची एवढी बळकट प्रतीति घडली असतां येशूच्या शरीराचें व रक्ताचें पवित्र भोजन करून मोठ्या सुदैवानें हातीं लागलेलें खरें मौल्यवान् मोतीं कां स्वीकारीत नाहींत कोण जाणें ! तसें होऊन जर हे कोठें सेंद्रपाळ बनले असते, तर सांप्रत पुस्तकांत जो त्यांनीं जागोजाग चारगटपणा केला आहे तो त्यांस पुरतेपणीं शोभता, व ज्या हतभाग्य वाचकांकरितां त्यांनीं सद्धर्माचे विचार इतके भरपूर जिकडे तिकडे ओतून दिले आहेत त्यांच्या मनावरही ते कांहीं अंशीं तरी ठसते. पण तसें न झाल्यामुळें वाचकांस सहजच असा अंदेशा येतो कीं, आपल्या उपदेशकांस फसविल्याबद्दल त्यांचें कांहीं तरी समाधान करण्याकरितां किंवा वर सांगितलेल्या भोजनांची मोकळीक त्यांच्या प्रसादानें आपणांस मिळाली अशा कृतज्ञत्व बुद्धीनें अगर डाक्टर उईलसनप्रभृति आपल्या सद्धर्मी आश्रयदात्यांस वरचेवर हंसवून त्यांनीं पुष्कळ प्रती घेतल्यासारखी त्यांची कांहीं तरी सेवा करावी. असे उद्देश मनांत धरून हे वर्णनकर्ते ग्रंथरचना करायास बसले असतां 'मोलवान् मोतीं' हातीं लागून बाकीचे सर्व धर्म एकदम कस्पटासारखे भासूं लागतात. हा मोलवान् लाभ तर आहेच! पण बुद्धीची

अतोनात तीव्रता प्राप्त होऊन सर्वज्ञतेची थोडीबहुत छाया मनुष्यावर पडते! राज्यव्यवस्थेचें, सैन्यव्यवस्थेचें, शहराच्या मांडणीचें वगैरे पूर्ण ज्ञान एकदम होऊन जिकडे पहावें तिकडे चुकाच चुका मनुष्याच्या नजरेस येऊं लागतात! अरेरे काय थोड्यानें गेलें! पेशव्यांनीं एवढें सैन्य ठेवायाची, एवढे गुणी लोक पदरीं बाळगायाची वगैरे व्यर्थ खटपट न करतां विलायतेहून एक दोन पाद्री जर आणविले असते, तर त्यांनीं असे दिव्य शिष्य तयार करून दिले असते कीं, त्यांच्या हातून फत्ते ह्मणून झाल्याशिवाय राहिलीच नसती! एका चार पांच वर्षांत त्यांनीं त्यास युद्धकलेंत, राजनीतीच्या कामांत, शहरांच्या बांधणीच्या कामांत वगैरे असें तरबेज केलें असतें कीं, त्यांनीं कोणाची मात्रा चालूं दिली नसती! नाहीं तर आतां पहा. पर्वतीचें तळें काय बांधिलें आहे, ते साडेतीन शहाणे काय, त्यांच्या मसलती काय, पेशवे किती अप्रयोजक, अंगास तीन चिमट्या राख लावून पळालेच तर कोणत्या उद्देशानें पळावें? उघडें बोडकें होऊन पावसांत जाऊन वेड्यासारखें बसूं नये येवढेंही त्यांस कळलें नाहीं! असो, एकंदरींत आमच्या बिचाऱ्या पेशव्यांच्या राजधानीचें वर्णन करण्यास एवढ्या ख्रिस्तभक्ताखेरीज दुसरा कोणी मिळाला नाहीं याचें आह्मांस फार वाईट वाटतें. तसेंच चमत्कारही असा वाटतो कीं, ज्यानें पांच सहा वर्षें या उद्योगामागें लागून एवढी जुनी माहिती मिळविली, त्यानें पेशव्यांविषयीं, नानाफडणविसाविषयीं वगैरे प्रस्तुत ग्रंथांत दाखल केलेल्या पोरकट, अप्रोजक गोष्टींखेरीज दुसऱ्या कोणत्याच गोष्टी बिलकूल ऐकल्या नाहींत. पण आमच्या शहाण्या वर्णनकर्त्यास बहुधा असें वाटलें असावें कीं, स्वत: मूर्तिपूजक असून त्या अत्यंत घोर पापमार्गाचे पुरस्कर्ते असल्यामुळें पवित्र शास्त्राच्या वचनाप्रमाणें

जे अक्षय नरकाचे धनी झाले अशा महापातकी लोकांचें तसेंच शेषाच्या मस्तकावर पृथ्वी, राहू, केतु, चंद्रसूर्याचे वैरी, पृथ्वी स्थिर, सूर्य फिरणारा असें मानणाऱ्या महामूर्ख लोकांचें काय वर्णन करावयाचें आहे! हल्लींच्या काळचें एखादें पोर त्यास ज्ञान शिकविण्यास समर्थ झालें असतें! असें वाटून जगाचे खरे कल्याणकर्ते, अकटोविकट ज्ञानसंपन्न असे मिचल साहेब, गार्डनर साहेब, व जोतिबा फुलेप्रभृति त्यांचे सच्छिष्यमणि अशांच्या नांवांनीं आपल्या पुस्तकास पवित्र करून मधून मधून पवित्र शास्त्रांतील अति सुंदर ओंग्या 'बैबलच्या बुरुजा'सारखे अत्यंत सरस दृष्टांत, आमच्या ग्रंथकारांनीं मोठ्या प्रेमानें मधें मधें गोंवून दिले असावे! असो; एकंदरींत हा ग्रंथ वाचला असतां मिशनरी लोकांच्या शिक्षणानें बुद्धि केवढी फांकते व सत्यनिष्ठा केवढी वाढते, वगैरे गोष्टी स्पष्ट दिसून येतात. तसेंच वरील दोन्ही ग्रंथांवरून इंग्रेजी विद्येचा फैलावा होऊन एकंदर लोकांच्या मनाची पोंच किती वाढली, व त्यांचें ज्ञान किती खोल आहे याचा चांगला अजमास होतो!

४ येथवर जें वर लिहिण्यांत आलें आहे त्याचा चांगला विचार केला असतां आमच्या देशाच्या इतिहासाची एकंदर सर्व लोकांस व आमची आह्मांसच किती गोडी लागण्याचा संभव आहे हें सहजच लक्षांत येईल. उघड आहे; उद्यां जर एखाद्यानें मोठे परिश्रम करून नीग्रो लोकांचा इतिहास जगांत प्रसिद्ध केला तर तो घेणारे व वाचणारे किती मिळतील बरें! वस्तुतः पाहतां वरचाही दाखला अगदीं बरोबर आहे असें ह्मणतां येणार नाहीं. नीग्रो लोकांविषयीं सर्वांचा व विशेषतः इंग्रेजांचा, जितका कळवळा आहे, तितका त्यांशीं समवर्ण व एकंदर जगाच्या मतें त्यांच्याच योग्यतेचे असे जे आह्मी त्यांविषयीं आहे कीं नाहीं

हें कोणालाही सांगायाला नको. ज्या पार्लमेंटानें नीग्रो लोकांच्या दास्यमुक्त्यर्थ कोट्यवधि रुपये खर्चले तींतच फॉसेट्, ब्राइट् या वक्त्यांच्या भाषणांचा किती जयजयकार होतो हें सर्वांस माहीत आहेच! नामांकित कवि लार्ड बायरन् यांनीं त्याच सभेंत एक विनोदाचें भाषण केलें, तें प्रकृत स्थलीं फार समर्पक आहे. ऐरिश लोकांच्या वतीनें कोणी सभासद तेथें भांडत असतां हे एकीकडे वळून आपल्या जवळच्या लोकांस ह्मणाले; "ह्या ऐरिश लोकांचा वर्ण गोरा आहे हें त्यांचें केवढें दुर्भाग्य आहे! हेच जर काळे असते तर त्यांच्या मुक्त्यर्थ याच सभेनें केवढा खटाटोप केला असता!" असो; तर याप्रमाणें सान्या जगांत अज्ञान, दुराचारी, वेडगळ ह्मणून जे निवडले गेले त्यांविषयीं माहिती कोण करून घेतो? कोणीं घेतलीच, तर मेकॉले, हॉल यांच्याप्रमाणें केवळ उपहास व तिरस्कार करण्याच्या बुद्धीनेंच घेतात. मेकॉले, साहेबांनीं 'लॉर्ड क्लाइव' च्या आरंभीं वरच्याच गोष्टीविषयीं मोठें आश्चर्य दाखविलें आहे, व क्लाइवप्रभृति वीरांनीं येथें जे मोठमोठे पराक्रम केले ते कोणासही वाचावेसे कां वाटूं नयेत याचें कारण आह्मांस बिलकूल समजत नाहीं असें ह्मणतात, पण कारण उघडच आहे. त्यांनींच स्वतां आपल्या निबंधांत जर हिंदूंस परम नीच, परम दुर्बळ असें सिद्ध करून दाखविलें आहे, तर अशा तृणप्राय लोकांवर मोठे अद्भूत जय मिळविले ह्मणून नवल कसचें असें अर्थातच त्यांचे शहाणे देशबांधव समजत असतील. अबिसिनियाची मोहीम, अशांटी लोकांची लढाई या जितक्या प्रेमानें वाचतील तितक्याच प्रेमानें अर्थात हिंदुस्थानाचाही इतिहास वाचतील. आणि हा लोकांचा तिरस्कार त्यांच्या दोन्ही निबंधांनींही तिळमात्र तरी कमी झाला असेल असेंही पण आह्मांस वाटत नाहीं. असो, तर

यामध्यें आमच्या देशाचा इतिहास परके लोकांस केवळ तिरस्कारास्पद आहे. आणि आमच्या देशाच्या संबंधें त्यांचे स्वतःचे पराक्रम वाचण्याचीही जर त्यांस हौस वाटत नाहीं तर खुद्द आमच्याच संबंधाचा इतिहास त्यांस किती रुचेल हें सांगावयासही नको! हा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो. 'हिंदुस्थानाचा इतिहास' असें ढळढळीत नांव वर घातलेल्या ग्रंथांतून बहुतेकांस खुद्द हिंदुस्थानाविषयीं किती माहिती असते हें सर्वांस ठाऊक असेलच! उदाहरणार्थ, सध्या चोहोंकडे चालू असणारा मॉरिस् साहेबांचा इतिहास पहा. या साहेबांनीं अगदीं मुळापासून तों तहत इ० सन १७३९ पर्यंतचा इतिहास सरासरी तीश पसतीस पानांत ओढून टाकून बाकीचा सर्व ग्रंथ इंग्रेजांच्या मजकुरानें भरला आहे. पेशव्यांचें तर त्यांत बिलकूल नांव सुद्धां नाहीं, आणि ज्या मुसलमानी घराण्यांनीं हिंदुस्थानावर कित्येक वर्षें प्रभुत्व भोगलें त्यांची हकीकत कोणाची दोन ओळी, कोणाची चार ओळी देऊन मनुष्याचा आपल्या कीर्तीविषयींचा गर्व किती व्यर्थ आहे हें प्रगट केलें आहे! अकबरचा पन्नास वर्षांचा इतिहास एका पानांत भरला आहे. आमच्या शिवाजीची दशा तर कांहीं पुसूंच नये! तो चोर होता येथून आरंभ करून त्यानें केलेला प्रसिद्ध खून मात्र सविस्तर वर्णन केला आहे, आणि बाकीच्या गोष्टींची कल्पना करणें वाचकांवरच सोंपवून दिलें आहे. असा एकंदर मजकूर सुमारें दोन अडीच पानें आहे. पण० तेवढ्यांत या विद्वान् इतिहासकारानें शंभर चुका केल्या आहेत! शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दहा वर्षें अगोदर ओढला आहे, अफजुलखानास तीन वर्षें उशीरानें मारविला आहे, संभाजीचा वध वगैरे गोष्टी शिवाजी जिवंत असतांच घडविल्या आहेत! बरें, एवढी घाई व इतक्या चुका करून साहेब

पुढें धांवले तरी कोठें? अर्थातच मेझर लॉरन्स, कर्नल मॉन-सन, लेफ्टेनंट—अशा महावीर्यशाली शूरांचे पोवाडे गाण्यास! खरेंच 'स्वजातिर्दुरतिक्रमा '! तेथें कोणाचा उपाय आहे! परवां सहज' पेनी सैक्लोपीडिया' नांवाच्या सर्व संग्रहरूप ग्रंथांत मराठ्यांचा इतिहास कसा काय दिला आहे ह्मणून पाहिलें. तों कांहीं अपूर्वच माहिती मिळाली! बाळाजी विश्वनाचा पुत्र बाळाजी बाजीराव; धाकट्या माधवरावाचें खरें नांव शिवाजी माधवराव; त्याचा पुत्र दुसरा बाजीराव! ! ! कां कशी खाशी माहिती आहे! पण इतकें. कशाला, आमच्या युनिर्सिव्हटींतही हा प्रकार दृष्टीस पडतो बी. ए. सारख्या परीक्षेस मराठ्यांच्या इतिहासावर असे प्रश्न असतातः—पेशव्यांची वंशावळी लिहा, 'पानपतची लढाई केव्हां, कोठें व कोणांमध्यें झाली! तिचे परिणाम काय झाले! ' केवढे जाडे प्रश्न हे! आह्मांस खचीत वाटतें कीं, असे प्रश्न देणाऱ्या परीक्षकांपेक्षां आमच्या मराठी शाळेंतल्या ' महाराष्ट्रदेश ' शिकणाऱ्या मुलांस मराठ्यांच्या इतिहासाची माहिती पुष्कळ ज्यास्त असते. असो; तेव्हां एकंदरींत आमच्या देशाकडे इंग्रेजांचें फारच दुर्लक्ष व फारच तिरस्कार! मेकॉले साहेबांनीं आपल्या दोन निबंधांत जसें केलें आहे त्याप्रमाणें जेव्हां त्यांस हरभऱ्याच्या झाडावर चढवावें, तेव्हां एतद्देशीय इतिहासाचा वगैरे ग्रंथ त्यांस पहावासा वाटतो. आमच्या एका कॉलेजबंधूनें पांच सहा वर्षांपूर्वी येथील ' 'यंग् मेन्स् असोशिएशन् ' ( ही सभा अजून आहे कीं नाहीं हें बाहेरच्या लोकांस सांगायाला नकोच! ) पुढें ग्रांट डफकृत मराठ्यांच्या इतिहासावर टीका ' या नांवाचा एक उत्कृष्ट निबंध वाचला, त्यांत त्यानें एका इंग्रेजी पत्रांतून घेतलेली सदहू साहेबांची हकीकत वाचली. ती तर आमच्या वरच्या लेखास फारच

मजबुती आणते. तींत मराठ्यांच्या इतिहासकारास आपला ग्रंथ छापून बाहेर काढण्यास केवढा भगीरथ प्रयत्न पडला, किती छापखान्यांचें आर्जव करावें लागलें, किती मोठमोठ्या लोकांच्या भिडा खर्ची घालाव्या लागल्या—हें सविस्तर लिहिलें आहे. या प्रसंगींचा मरे ( छापखानेवाला ) व डफ् यांचा संवाद मोठा लक्षांत ठेवण्यासारखा झाला. तो डफ् साहेबानें स्वतः असा लिहून ठेवला आहे:—"त्यानें मला सांगितलें कीं, जर तुह्मीं ग्रंथाचें नांव बदलाल तर आह्मी तो छापूं. मी ह्मटलें कीं, हा ग्रंथ मराठ्यांची बखर आहे, यास्तव 'मराठ्यांचा इतिहास' हेंच नांव त्यास योग्य आहे. तो ह्मणाला, तें खरें; परंतु मराठ्यांची यत्किंचित् तरी माहिती कोणास आहे? त्यास मीं उत्तर दिलें हें पुस्तक करण्याचें कारण काय तें तेंच. मराठ्यांची माहिती लोकांस फार थोडी आहे.' मरेनें उत्तर केलें, ठीक; तुह्मी ह्मणतां तें खरें आहे; पण माहिती असावी अशी तरी इच्छा कोणास आहे! तुह्मीं या ग्रंथाचें नांव मोगलांचा पाडाव किंवा इंग्रज लोकांचा उत्कर्ष' असें ठेवल्यास तें ठीक होईल. परंतु 'मराठ्यांची बखर!' छे, हें पुस्तक कोणी विकत घेणार नाहीं!" मरे साहेबांचें भाकीत अक्षरशः खरें झालें. हिंदस्थान लुटून जे गब्बर झाले त्या कोर्ट ऑफ डायरेक्टरच्या सभासदांनींच मुळीं चाळीस प्रती घेतल्या, पण त्या पावल्याचें उत्तरही पाठविलें नाहीं. मग इतर लोकांत या बखरीचा किती खप झाला असेल हें सांगावयासच नको. डफ साहेब शेवटीं लिहितात "हा जो मीं एवढा खटाटोप केला त्यांत मला कवडीचाही फायदा न होतां उलटा ११७०० पेक्षां जास्ती रुपयांस मात्र मी बुडालों."

५. वरील गोष्टींवरून इंग्रेजांस आमच्या देशाचें ज्ञान

कितपत आहे व तें मिळण्याची इच्छा तरी कितपत आहे हें आमच्या वाचकांस पुरतेपणीं कळल्यावांचून राहणार नाहीं. तरी त्याबद्दल त्यांस मोठेसें नांव आह्मांस ठेवतां येत नाहीं. ज्या त्या प्रकरणीं मोठी घमेंडी मारण्याची जी त्यांस संवय लागून गेली आहे तिचा अप्रयोजकपणा वर दाखल केलेल्या गोष्टींवरून उघड दिसेल खरा; पण ज्या देशाशीं ते अगदीं अपरिचित, जेथील रीतभात, भाषा, लोकांच्या समजुती वगैरे त्यांच्याहून फारच वेगळ्या, त्याचा इतिहास वाचण्याची त्यांस गोडी कशी लागावी! 'अहिल्याबाई' 'माधवराव' हीं नांवें जशीं आह्मांस गोड लागतात, तशीं "Ahilabye, Madhoorao," ज्यांचा उच्चारही त्यांच्या भाषेनें होणें कठीण, व झाला तरी कानास कर्कश लागणारा,—तीं त्यांस तशीं न लागून त्यांचा त्यांस त्रास येत असल्यास नवल काय? असो, तर न्यूहालंडचा किंवा अमेरिकेचा इतिहास जसा आह्मांस तसाच आमचा इतिहास त्यांना होय; व यास्तव त्यांची त्यावर अप्रीति असल्यास त्यांत कांहीं विलक्षण नाहीं. पण हीच अप्रीति खुद्द आमच्यांतच असल्यास मग तर काय ह्मणावें? आमच्या देशाचे प्रख्यात वीर होऊन गेल्यास अजून शंभरही वर्षें होऊन गेलीं नाहींत—खुद्द आमच्या आठवणींतही आमचें राजतेज शेवटच्या धूमावस्थेंतून एकाएकीं प्रज्वलित होऊन त्याच्या प्रचंड लोळानें सगळ्या हिंदुस्थानास धाक दाखविला, व सगळें जग त्याकडे आश्चर्यानें स्तब्ध होत्सातें पहात राहिलें! तरी आमची देशप्रीति व बुद्धीची तीव्रता केवढी! आह्मी केवळ हवालदील होऊन एकमेकांस साशंक विचारतों, 'काय हो, आह्मी कसचे लोक—किती भितरे, केवढे आगूबाई, आह्मांस हवें त्यानें खुशाल तुडवावें! आमच्यांत वीर असे हाका मारायला झाले कधीं! आमचे वीर ह्मटले

ह्मणजे बाजीरावासारखे बंदकीच्या बाराला भिणारे! मेकॉले साहेबांनीं बकऱ्यांची उपमा आह्मांस दिली आहे ती ठीक!! वर शौर्याच्या संबंधानें आमच्या तर्कशास्त्राचे तारे तुटले! तसेच प्रत्येक गोष्टीच्या संबंधानेंही हरहमेश तुटत असतात! मेकॉले, मिल्ल, पाद्रीसाहेब यांच्या सुविचारांचें अखंड सेवन केल्यानें बुद्धींत अतोनात प्रकाश कोंदून तो वरील रूपानें लोककल्याणार्थ बाहेर पडतांना पुष्कळांनीं पाहिला असेल; किंवा त्याचें स्थिर रूप कोणास पाहणें असल्यास तो हेतु मागें सांगितलेले दोन अनुपम ग्रंथ सहज पूर्ण करतील. एकंदर हिंदु लोकांचा थोडक्यांत पराभव करून टाकून अल्पायासानें अरण्यपांडित्य ज्यास मिरविणें असेल त्यास वरील कोठारांत हवीं तितकीं अपूर्व शस्त्रास्त्रें सांपडतील! असो; उपाय काय? सांप्रतच्या स्थितींत जाळ्यांत अडकलेल्या वाघाप्रमाणें जो जो मानभंग होईल तो तो आमच्या देशास सोसणें भाग आहे ! मेकॉलेच्या देशबांधवांची आमच्या काळ्या लोकांवर जशी सहज लीलेनें चाबकांची, छऱ्यांची वगैरे कृपा होते, तशीच त्यांच्या सारख्या महापंडितांची आमच्या विद्यादिकांवरही होते हें अनुरूपच आहे! अशांच्या फर्डेशाईपुढें आमच्या बिचाऱ्या हिंदु लेखणीनें टिकाव धरावा हें मुळींच संभवत नाहीं; तरी तिच्या सपाट्यानें अगदीं गतप्राणच न होऊन ज्यांच्यांत अजून थोडी धुगधुगी तरी उरली असेल त्यांस जिववण्याचा यथाशक्ति यत्न करणें आह्मांस योग्य वाटतें. यास्तव आह्मीं अशांस इतकेंच सांगणार कीं, बाबांनो! ज्यांच्यांत पाणिनी, वाल्मीकि, कालिदास, अर्यभट्ट, भास्कराचार्य, गदाधरभट्ट, वगैरे असंख्यात धेंडें निपजलीं, त्या लोकांची केवळ मूर्खांतच गणना करणें कठीण आहे; ज्यांच्यांत राम पांडवादिक नाहीं धरिले तरी विक्रमादित्य, इतिहासप्रसिद्ध पोरस, शि-

वाजी, बाजीराव, यशवंतराव, रणजितसिंग विजेच्या गतीनें सैन्यासहवर्तमान धांवणारा परवांचा शूर, असे तरवारबहाद्दर होऊन गेले ते केवळ ‘ मेंढ्या ’ च असतीलसें नाहीं. तसेंच ज्यांच्यांत तुकाराम, रामदास, किंवा रामशास्त्री, माधवराव असे निष्पाप महात्मे; व रमाबाई, अहिल्याबाई, अशीं भूतलास भूषित व पवित्र करणारीं स्त्रीरत्नें निर्माण झालीं, त्याच लोकांस अघोर पातकी, दुराचारी, निर्दय ह्मणणें ह्मणजे शुद्ध दांडगाई आहे; आणि जो धर्म सर्वांत प्राचीन असून शंकराचार्यांसारख्यांनीं ज्याच्या रक्षणार्थ आपली बुद्धि खर्चली तो मेकॉले, रेवरेंड विलसन किंवा ज्योतिबासारखे त्यांचे कल्याण, अशांच्या बडबडीनें व शुष्क तर्कांनीं ऱ्हास पावेल हें मुळींच संभवत नाहीं ! वरील गोष्टी इतक्या धडधडीत स्पष्ट दिसत असतांही आमच्या लोकांस त्या अलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत; हें तर काय, पण आपणास अधिकाधिक कुत्सित ह्मणून घेण्यांतच पुष्कळांस काहीं विलक्षण प्रतिष्ठा वाटते. ‘ हिंदु ’ हा शब्द ‘ मूर्ख ’ शब्दाशीं केवळ समानार्थच होय असें ते समजतात, आणि त्यांतून जितकें सुटून जातां येईल तितकें जाण्याचा बहुतेकांचा प्रयत्न दृष्टीस पडतो. हा हिंदुत्वाचा द्वेष कित्येकांच्या ठायीं इतका जागृत असतो कीं, पोषाक, रीतरिवाज, आचार वगैरे गोष्टींत सर्व प्रकारें इंग्रजांचा नमुना उचलला असल्यामुळें त्यांच्या पूर्वस्थितीची एक मात्र काय ती मोठी खूण त्यांच्यांत राहिली:— ती अर्थातच काळा रंग ! हा जाण्याचा जर एकादा अपूर्व उपाय इंग्लिश लोक काढतील तर आमच्या देशांत त्यांचे पुष्कळ नवे बंधु बनतील ! असो; तर याप्रमाणें दिवसेंदिवस आमची स्थिति मोठी विलक्षण होत चालली आहे. आमची मूळची स्थिति तर आह्मांला नकोच; पिसें लावून थोरांच्या मंडळींत शिरूं पाहातों, पण ते तर

आह्मांस निग्रो, हॉटेंटॉट अशांच्या पंक्तीस सरासरी बसवतात! चोहोंकडे इंग्रजी माजल्यानें आमची भाषा आह्मांस येईनाशी झाली, देशाभिमान सहजच विगलित झाला,—कारण चागलें ह्मणण्यासारखें आमच्यांत कांहींच नसून दोष ठेवण्यासारखेंच सारें पडलें, तेव्हां त्याचा अभिमान ह्मणजे दुरभिमानच होय ! धर्माची तर अशी लाज वाटूं लागली कीं, कांहीं बोलण्याची सोय नाहीं! तेव्हां एकंदरींत देश नाहीं भाषा नाहीं, धर्म नाहीं, रीतरिवाज नाहीं, असें पोरकें राष्ट्र आह्मीं सध्यांच्या स्थितींत झालों आहों! असें झाल्यामुळें जो कोणी पूर्वींच्या संबंधाचें कांहीं चांगलें ह्मणेल तो एक वेडगळ तरी असेल किंवा मूर्ख तरी असावा असा एकदर लोकांचा ग्रह होऊन गेला आहे. वर 'मराठ्यांच्या इतिहासावर टीका' ह्मणून एका निबंधाचा आह्मीं उल्लेख केला; त्याचा त्या माजी सभेनें व एकंदर लोकांनीं वर सांगितल्या प्रकारेंच आदर केला; ह्मणजे अशा निबंधापासून तादृश कांहीं उपयोग नाहीं असा त्या ठिकाणींच लिहिणारास सभेचा अभिप्राय मिळून पुढें त्यानें तो छापला असतां आज सात वर्षें बहुधा जशाचा तसाच छापखान्यांत लोळत पडला आहे. पण इतक्यानें झालें नाहीं. ज्या रात्रीं तो वाचला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं ज्ञानप्रकाशांत एकानें पत्र पाठवून सर्वांस कळविलें कीं, त्या निबंधांत कांहीं जीव नव्हता. आणि सभेंत अध्यक्षांनीं वगैरे जी त्याची कांहीं तारीफ केली तो सर्व प्रकार 'पंचतंत्रांतील 'पूर्वं तांवदहं मूर्खो........ सर्वं वै मूर्खमंडलम्' असा झाला ! असो; वरील गोष्टींवरून आपल्या इतिहासाची आमच्या लोकांत एकंदरींत किती गोडी आहे ती स्पष्ट दिसून येते. तसेंच आमच्यांत विद्वान् ह्मणविणारांसही त्याची किती माहिती असते व माहिती करून घेण्याची इच्छा तरी कितपत असते, तीही

येथें विशेषत: सांगावयास पाहिजे असें नाहीं.

६. असो. प्रस्तुत निबंधांत ज्या विषयाचें विवेचन करावयाचें होतें त्याच्या नुसत्या प्रस्तावनेदाखलच सरासरी हा इतका मजकूर लिहावा लागला. आतां यापुढें मुख्य विषयावरच जर आणखी लिहूं लागलों, तर त्याचें जसें व्हावें तसें अध्ययन जरी अजून आमचें मुळींच झालें नाहीं, तरी सुद्धां पुष्कळ लिहिण्यास सांपडेल; आणि हा विषय हिंदूंसच स्वत: ह्मटला ह्मणजे मोठा मोहक पडला, यास्तव आरंभ केला असतां एकाएकीं तो सोडतां येणेंही कठीण. पण आमच्या वाचकांस इतका लांब मजकूर वाचूनही अगोदर कदाचित् कंटाळाच आला असेल असें आह्मांस वाटतें; यास्तव इकडूनही पहातां सांप्रत विषय, येथेंच तसा तहकूब ठेवणें आह्मांस बरें वाटतें. या खेपेस आमच्या देशाविषयीं ज्यापासून माहिती आह्मांस मिळते,—कीं जी बहुधा 'बाबावाक्यं प्रमाणम्' या न्यायानेंच आपण गृहित धरून चालतों,—त्यांस ती खरी मिळण्याचा संभव किती, व यास्तव ती आपण किती जपून मान्य केली पाहिजे, ही एक मोठी गुह्याची गोष्ट जर या अंकावरून आमच्या वाचकांच्या मनावर पक्की ठसेल तर एक मोठीच गोष्ट मिळविलीशी होईल. तसेंच मनोरंजनांत आपल्या देशाचा इतिहास कोणत्याही दुसऱ्या देशाच्या इतिहासाहून उणा नाहीं हेंही जर या एकंदर निबंधावरून वाचकांच्या लक्षांत येईल, तर तेवढ्यानेंही तो लिहिल्याचा हेतु सफळ झालासें होईल. असो; तरी लिहावयाच्या एक दोन मोठ्याच गोष्टी राहिल्या. त्यांतील पहिली ही कीं, प्रस्तुतचे इंग्रजी इतिहास फारच अपुरते असतात,—ह्मणजे संस्थानिक वृत्तांताखेरीज आमच्या विद्या, कला, स्थितिरीति, वगैरेविषयीं त्यांत बिलकूल एक अक्षरही असत नाहीं. दुसरी ही कीं, आमच्या मराठींत

इतिहास चांगला वाचण्याजोगा झटला तर मुळींच नाहीं, व एकंदर लोकांत त्याविषयीं येवढें अज्ञान असण्याचें एक मोठें कारण तेंच आहे. यासारख्या आणखी दुसऱ्या कांहीं न्यूनता मागें एक दोन वेळां सांगितलेल्या ' ग्रांट डफवर टीका ' नांवाच्या निबंधांत चांगल्या रीतीनें दाखविल्या आहेत, त्या प्रस्तुत लेखाच्या परिशेषार्थ वाचकांनीं पहाव्या. तसेंच मराठींतील विद्यार्थ्यांनीं इतिहासावर शालापत्रकाच्या-ही एका अंकांत कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत तेही वाचण्यास आह्मीं त्यांस शिफारस करितों. आतां सरते-शेवटीं एकंदर लोकांस या विषयाच्या संबंधानें कांहीं सूचना करण्याजोग्या आहेत त्या येथें लिहून हा अंक पुरा करितों. वर जें इतकें विवरण केलें त्यावरून आपल्या देशाचा इति-हास चांगला होऊन त्याची सर्वांस माहिती झाली असतां किती उपयोग होणार आहे हें सर्वांच्या ध्यानांत आलेंच असेल. यास्तव ज्यांस तशी माहिती मिळण्याचा संभव असेल त्यांनीं ती बुडूं न देतां तिचा संग्रह करून ठेवावा. आमचीं जुनीं लहान मोठीं राज्यें अजून साऱ्या देशभर पुष्कळ आहेत; तर त्यांचा स्वाहा जोंवर झाला नाहीं तोंवर तरी लोकांनीं सावध होऊन आपल्या नुकत्या होऊन गेले-ल्या पराक्रमी पूर्वजांची येवढी तरी सेवा करावी. असें केलें असतां आपला देशाभिमान जागविलासा होऊन आपल्या वाडवडिलांचे उपकार फेडलेसे होतील;—कारण त्यांची कीर्ति वाढविणें जर आपल्या हातून होत नाहीं, तर तिचें रक्षण करून ती बुडूं न देणें हें तरी आपण श्रेय घ्यावें; आणि हें पहिल्यापेक्षां पुष्कळ सोपेंही आहे हें उघड आहे. आतां हें कृत्य आपले सध्यांचे धनी इंग्रज लोक ह्यांच्या विरुद्ध केलेंसें होईल. किंवा केलेंसें ते समजतील, याविषयीं बिलकूल संशय धरण्यास जागा नाहीं. ते इतर संबंधानें

कसेही असले, तरी येवढ्यांत तरी अत्यंत उदार आहेत. फार तर काय, पण त्यांनींच जर ही माहिती मिळवून ठेविली नसती तर माधवराव काय, आणि बाळाजी विश्वनाथ काय सर्व आतांपर्यंत आपणास एकच होऊन गेले असते ! शिवाय दुसरें असें कीं, अशी माहिती ग्रांड डफ्, मालकम् अशांच्या ग्रंथांत कांहीं आहे खरी; पण ती केवळ राजकीय संबंधाची. पूर्वींची किरकोळ माहिती जागोजागच्या लोकांस जशी असेल तशी सर्व—ही अगोदर त्यांस कळली नसेल हें एक; आणि दुसरें, ती सर्व त्यांस आपापल्या ग्रंथांत घालतांही आली नाहीं. अशा माहितीचा वास्तवीक निराळाच ग्रंथ असला पाहिजे, व 'पिक्टोरियल हँड बुक ऑफ् लंडन' अशा तऱ्हेचे निराळेच ग्रंथ इंग्लंडांत वगैरे करतात तसें आमच्या पुण्याच्या 'वर्णनां' त असेलसें पाहिल्याबरोबर सर्वांस वाटतें; पण ग्रंथकर्ते ब्राह्मण धर्माचे, व तेव्हां अर्थातच पेशव्यांचे वगैरे शत्रु असल्यामुळें त्यांचें जिच्या योगानें गौरव होईल अशी एक सुद्धां गोष्ट त्यांनीं आपल्या ग्रंथांत दाखल केली नाहीं. फुलांतून मधमाशा मध काढतात, पण त्यांतूनच दुसरे किडे विष काढतात, याप्रमाणेंच त्यांनीं कृति केली ! असो; येथें शेवटीं इतकेंच सुचवितों कीं, आमच्या मराठी शहरांचीं जर यापुढें अशींच कोणीं वर्णनें रचिलीं तर तें काम पुरें होईपर्यंत तो रचणारा मोठा भाविक ख्रिस्ती असला तरी त्यानें आपलें पवित्र शास्त्र तोंपर्यंत एकीकडे गुंडाळूनच ठेवावें ! असो. तेव्हां आमच्या लोकांस यासंबंधें हीच सूचना करावयाची कीं, अशी माहिती कितीही क्षुल्लक वाटली, तरी तिचा त्यांनीं नीट संग्रह करून ठेवावा; कांकीं, कधीं कधीं एखाद्या अशा क्षुल्लक गोष्टींतही असें तात्पर्य असेल कीं, तिच्या योगानें कदाचित् इतिहासही फिरूं शकेल ! त्यांतूनही नेटिव संस्था-

नांतून दप्तरी माहिती किंवा जुने लेख ज्यांपाशीं असतील त्यांनीं तर तीं फारच जपून ठेवावीं. अशा प्रकाचा उद्योग आमचे बंधू 'विविधज्ञानविस्तार' कर्ते यांनीं करण्याचें मनावर घेतलें होतें. पण लोकांच्या अज्ञानास्तव, हयगयी-मुळें, किंवा वेडच्या समजुतीमुळें त्यांस त्यांत फारसें कोणीं साह्य केलें नाहीं असें दिसतें. हा प्रकार अत्यंत शोचनीय होय! असो; याखेरीज जुन्या माहितीचा आणखी एक मार्ग सध्यां तादृश प्रसिद्ध नसणारे इंग्रजी ग्रंथ होत. गेल्या शंभर दीडशें वर्षांत इकडे आलेल्या इंग्रज लोकांनीं लिहून ठेवलेले पुष्कळ ग्रंथ आहेत. ते कधीं मधीं दृष्टीस पडतात. त्या काळीं आपली स्थिति फार निराळ्या तऱ्हेची असल्या-मुळें कित्येक तर इतके तल्लीन होऊन गेले होते कीं त्यांचीं मूळचीं मतें जाऊन बहुतेक आमच्या सारखींच झालीं होतीं. अशांस सर जेम्स् म्याकिंटास्, जे कांहीं दिवस मुंबईचे रेकार्डर (न्यायाधीश) होते त्यांनीं 'ब्राह्मण बनलेले युरोपियन' असें एके ठिकाणीं ह्मटलें आहे, वास्तवीक पाहतां यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कांकीं, त्या काळीं हल्लीं-प्रमाणें ब्राह्मण्य हें रेलवेच्या गार्डाच्या पायांवारी जात न-व्हतें; तर गजमस्तकारूढ झालेलें, किंवा अश्वारूढ होऊन शत्रूंवर गर्जणारें अशांपैकीं होतें! अजूनही वृद्ध लोकांच्या तोंडून आपण असें ऐकतों, कीं पहिले साहेब फार दयाळू असत, इकडच्या लोकांचा ते फार बोज ठेवीत, तें खोटें नव्हे. आतां प्रमाणें चुटपुटती विलायतेस परीक्षा देऊन व येतांना ऐकालेचे दोन निबंध वाचून अरेराव होऊन आलेले ते नसत. त्यांस लोकांच्या अनुरोधानें वागणें पडे. असो; तर अशांच्या ग्रंथांत आपणास अनकूल असा पुष्कळ मजकूर सांपडतो. मालकम् साहेबांचा वर एक लेख लिहिला आहेच व अहिल्याबाईचें त्यानें किती चरित्र मिळवून लिहून ठेविलें

आहे तेंही बहुतेकांस विदित असेलच. तसेंच ' विविधज्ञानविस्तारा ' च्या एका अंकांत स्कॉट नामक एका ग्रंथकाराचा अफजुलखानाच्या वधाविषयींचा मजकूरही पुष्कळांनीं वाचला असेल. अजूनही हिंदूचे पक्षपाती इंग्रज लोक कित्येक सांपडतील. ' तारा ' ' सीता ' ठगाची जबानी ' या सर्व प्रसिद्ध ग्रंथांचे कर्ते क्याप्टन मेडोज टेलर हे अशांत अग्रगण्य होत. यांनीं नुकताच एक हिन्दुस्थानाचा इतिहास स्वभाषेंत लिहून प्रसिद्ध केला आहे; त्यांत सर्व भागांचें यथास्थित विवरण केलें असून मॉरिस्, मेकॉले, मिल्ल, यांच्यापेक्षां फार निराळ्या तऱ्हेचीं मतें त्यांत प्रदर्शित केलीं आहेत. अशाच तऱ्हेचे आणखी एक दोन लहान इतिहास अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. असो; तर गेल्या काळाविषयीं चमत्कारिक व खरी माहिती मिळण्याचा हा तिसरा मार्ग आहे. तर याप्रमाणें असत्यरूप व भ्रांतिरूप धुकें जें या देशभर आजपर्यंत पसरून राहिलें आहे त्याचें निरसन करून सत्यरूप सूर्याचा व ज्ञानाचा खरा उदय अजूनही व्हावा अशी आजची तर स्थिति आहे,

२७१५

REFBK-0002715